महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com | www.facebook.com/maharashtra.c.times | Info@maharashtracrimetimes.com | Twitter- @MHCrimeTimes | Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

• वर्ष : १२ • अंक: १० • पृष्ठ: ४ • मुंबई, मंगळवार ८ जून २०२१ ते सोमवार १४ जून २०२१ • RNI. REG. NO. 105858/2010 • POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## सुविचार

पाणी आयुष्यभर झाडाला मोठं करतं म्हणूनच की काय पाणी लाकडाला कधीच बुडू देत नाही....

## थोडक्यात

### अनलॉक होताच मुंबईकर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी

**मुंबई (रानेश गायकवाड)-** कोरोना महामारीच्या वाढत्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने गेल्या दीड महिन्यापासून राज्यात कडक निर्बंध लागू केले होते. आता राज्य सरकारने संपूर्ण महाराष्ट्र अनलॉक करायला सुरुवात केली आहे. त्यासोबतच कोरोना नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई



करण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे. सोमवारी मुंबई अनलॉक होताच मुंबईकर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी करताना दिसले. त्यामुळे मुंबईतील महत्त्वाच्या चौकात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होता. यामुळे मुंबईतील इस्टर्न व वेस्टर्न एक्सप्रेस वे वर वाहनांच्या मोठ्याप्रमाणावर रांगा पहायला मिळाल्या. कार्यालयात दाण्यासाठी लोक BEST बस स्टॉपवर रांगांमध्ये उभे असलेले दिसले.

### मुलायम सिंह यादव यांनी लस घेताच उत्तरप्रदेशच्या उपमुख्यमंत्र्यांनी अखिलेश यादव यांच्यावर साधला निशाणा, म्हणाले...

**पटना (वृत्तसंस्था)-** समाजवादी पार्टीचे प्रमुख मुलायम सिंह यादव यांनी करोनाच्या लसीचा पहिला डोस




घेतला. गुडगावमधील मेदांता रूग्णालायत मुलायमसिंह यादव यांनी लस घेतली आहे. तर, समाजवादी पार्टीने मुलायमसिंह लस घेतानाचा फोटो देखील ट्विट केला आहे.

मात्र आता उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य यांनी मुलायमसिंह यांच्या लसीकरणावरून माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांच्यावर निशाणा साधला आहे. केशवप्रसाद मौर्य यांनी ट्विट करत स्वदेशी लस घेतल्याबद्दल मुलायमसिंह यादव यांना धन्यवाद देखील म्हटले आहे. तसेच, त्यांनी आपल्या ट्विटमध्ये असे देखील म्हटले आहे की, तुम्ही लस घेणं याचे प्रमाण आहे की, अखिलश यादव यांनी लसीबाबत अफवा पसरवली होती. यासाठी अखिलेश यादव यांनी माफी मागायला हवी. तसेच, उत्तर प्रदेश भाजपाचे अध्यक्ष स्वतंत्र देव सिंह यांनी देखील अखिलेश यादव यांच्यावर निशाणा साधला आहे.

# मोदींची मोठी घोषणा, सर्वांना मोफत लस मिळणार

## १८ वर्षावरील सर्वांचं २१ जूनपासून मोफत लसीकरण करणार, केंद्र सरकार सर्व खर्च उचलणार

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)- भारतात गेल्या १०० वर्षात अशी महामारी आली नव्हती. या महामारीच्या संकटाचा सामना करतानाच भारताने गेल्या एका वर्षात दोन मेड इन इंडिया व्हॅक्सिन बनवून दाखवल्या आहेत, असं सांगतानाच आता लसीकरणाची १०० टक्के जबाबदारी केंद्र सरकारची असेल. २१ जूनपासून १८ वर्षावरील सर्वांना केंद्र सरकार मोफत लस देईल. राज्य सरकारला एक पैसाही खर्च करण्याची गरज राहणार नाही, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज देशातील जनतेशी संवाद साधला. यावेळी त्यांनी कोरोनाचं संकट आणि केंद्र सरकारने केलेल्या तयारीचा आढावा घेतला. गेल्या १०० वर्षात अशी महामारी आली नव्हती. देशाने या संकटाचा अनेक आघाड्यांवर सामना केला आहे. गेल्या दीड वर्षात आपण हेल्थ केअर स्ट्रक्चर वाढवण्यात आले आहे. मेडिकल ऑक्सिजनची या देशात कधीच एवढी कमतरता जाणवली नव्हती. त्यासाठी सैन्य दलाच्या तिन्ही तुकड्यांना कामाला लावण्यात आल्या. जगातील कानाकोपऱ्यातून जे काही आणणं शक्य होईल ते आपण आणून या संकटाचा सामना केला, असं मोदी म्हणाले. येत्या २१ जूनपासून



१८ वर्षावरील सर्वांना मोफत लस देण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यांना एक पैसाही खर्च करावा लागणार नाही. सर्वांना मोफत लस देण्याची जबाबदारी ही केंद्र सरकारची आहे. भारतात सर्वांना मोफत लस दिली जाईल.

## पंतप्रधान गरीब कल्याण योजनेच्या माध्यमातून नोव्हेंबरपर्यंत मोफत धान्य मिळणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (७ जून) देशवासियांशी संवाद साधला. देशात २१ जूनपासून १८ वर्षावरील सर्वांचं लसीकरण मोफत होणार असल्याची मोठी घोषणा पंतप्रधानांनी केली. तसंच कोरोनाची दुसरी लाट अद्यापही गेलेली नाही. कोरोना काळात अनेक जण आर्थिक संकटांचा सामना करत आहेत. त्यामुळे कोरोनाच्या संकट काळात देशातील नागरिकांना पंधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत मोफत धान्य मिळण्याची सुविधा देण्यात आली होती. हीच सुविधा कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्येही कायम राहणार आहे. मे आणि जूनमध्ये ही योजना सुरू राहणार असून, पुढे दिवाळीपर्यंत नागरिक या सुविधेचा लाभ घेऊ शकणार असल्याची घोषणा मोदींनी केली आहे.

देशातील गरीब जनतेसोबत त्यांचे साथी बनून सरकार खंबीरपणे त्यांच्यासोबत उभं असल्याचं मोदी म्हणाले. ८० कोटीहून अधिक नागरिकांना या योजनेंतर्गत मोफत धान्य देण्यात येणार आहे. ही सुविधा यापुढेही नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिक आता इश गरीब कल्याण योजनेच्या माध्यमातून रेशन धान्य दुकानातून मोफत धान्य घेऊ शकतात. देशातील कोणताही व्यक्ती उपाशी राहू नये हेच यामागील उद्दिष्ट्य असल्याचंही ते म्हणाले.

देशात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचं संकट अद्याप आहे. कोरोना नियमांचं पालन करणं गरजेचं आहे. गेल्या १०० वर्षातील ही मोठी महामारी आहे. इतिहासात पहिल्यांदाच इतका मोठा ऑक्सिजन पुरवठा करण्यात आला आहे. देशात जगभरातून औषधं मागवण्यात आली, तसंच कोरोना काळात सर्वाधिक औषधनिर्मिती करण्यात आली. आरोग्य सुविधा मोठ्या प्रमाणात वाढवल्या गेल्याचं मोदींनी आपल्या भाषणात सांगितलं.

तसंच, भारतात अतिशय कमी काळात एका वर्षातचं दोन लशींचा शोध लावला गेला. देशात इतर लशींनाही मान्यता दिली गेली. कोरोनासाठी लसीकरण हे सुरक्षाकवच आहे. आतापर्यंत २३ कोटींहून अधिक नागरिकांचं लसीकरणं करण्यात आलं आहे. लसीकरण अजूनही मोठ्या प्रमाणात वाढवण्यात येणार आहे. ७ कंपन्याकडून लस निर्मिती सुरू आहे, तर ३ कंपन्यांचं ट्रायल सुरू आहे.

## यंदाचा पावसाळा अतिधोकादायक; लक्षावधी वर्षांतील माहितीच्या आधारे निष्कर्ष

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा)-** मागील आठवड्यात केरळात मान्सून दाखल झाल्यापासून संपूर्ण देशभर आनंदाचं वातावरण आहे. भारतीय हवामान खात्याच्या



सुधारित अंदाजानुसार, यावर्षी देशात १०१ टक्के मुबलक पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. त्याचबरोबर यावर्षी देशात दुष्काळाची शक्यता जवळपास नसल्याची माहितीही हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचं वातावरण पाहायला मिळत आहे.

अशातच देशातील शेतकऱ्यांच्या चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. यंदाचा पावसाळा अधिक धोकायदायक असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञांकडून देण्यात आली आहे. दशलक्षावधी वर्षातील माहितीच्या आधारे काढलेल्या निष्कर्षावरून यंदाचा पावसाळा अधिक धोकादायक असल्याचा इशारा हवामान शास्त्रज्ञांकडून देण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षातील मान्सूनसंदर्भात केलेल्या संशोधनावरून हवामान बदलामुळे पावसाळ्यावर परिणाम होत असल्याची माहितीही शास्त्रज्ञांकडून देण्यात आली आहे.

## महाराष्ट्रात १ लाख मृत्यूःजगात दहाव्या स्थानावर महाराष्ट्र, पाच महिन्यात ५० हजारांपेक्षा जास्त मृत्यू, राज्यात देशातील २९ टक्के मृत्यू

**मुंबई (योगेश होळंब)-** राज्यात गेल्या काही दिवसांपासून कोरोनाचे रुग्ण कमी होताना दिसत आहे. त्या पाठोपाठ मृत्यूच्या आकडेवारीत देखील घट पाहायला मिळत आहे. गेल्या दीड वर्षात महाराष्ट्र राज्यात कोरोनामुळे दीड लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. हा आकडा जगातील टॉप टेन मध्ये असून महाराष्ट्राने मृत्यूंच्या आकडेवारीत २१२ देशांना मागे टाकले आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्राच्या मृत्यूची ही आकडेवारी जगातील कित्येक देशांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्र राज्यात गेल्या २४ तासात ६१८ लोकांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. देशात आतापर्यंत ३ लाख ४७ हजार २८ लोकांचा मृत्यू झाला आहे. राज्यात आतापर्यंत १ लाख मृत्यू झाले असून भारतातील २९ टक्के मृत्यू हे फक्त महाराष्ट्रात झाले आहे. कोरोनाच्या पहिल्या लाटेच्या



तुलनेत दुसऱ्या लाटेमध्ये मृत्यूचे प्रमाण जास्त पाहायला मिळाले आहे. दरम्यान, राज्यात ऑक्सिजन, बेडस, व्हेंटीलेटर आणि अत्यावश्यक औषधांचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर भासला होता. राज्यात पहिला कोरोनाबाधीत रुग्ण ९ मार्च रोजी आढळला असून पहिला मृत्यू १७ मार्च रोजी झाला होता. गेल्या ४५३ दिवसांत आतापर्यंत १ लाख १३० लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे सरासरी २२० लोकांनी आपले प्राण गमावले आहे. ३१ मार्च रोजी राज्यात ३०२ कोरोनाबाधीत रुग्ण आढळले होते. यामध्ये १० लोकांचा मृत्यू झाला होता.

राज्याच्या मृत्यू लेखा समितीचे अध्यक्ष डॉ. अविनाश सुपे म्हणाले की, कोरोना महामारीच्या पहिल्या लाटेमध्ये म्हणजे (मार्च ते डिसेंबर २०२० दरम्यान) राज्यांत पहिल्या १० महिन्यांत ५० हजार लोक कोरोनामुळे मरण पावले आहे.

## मुंबईसह कोकणातील सर्व जिल्ह्यात ४ दिवस अतिवृष्टीचा हवामान खात्याचा इशारा

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** मुंबई महानगर क्षेत्रासह कोकणातील सर्व जिल्ह्यात दिनांक ९ ते १२ जून या चार दिवसांच्या काळात हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला असल्याने या चार दिवसाच्या काळात आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित काम करणाऱ्या सर्व यंत्रणेने, सर्व जिल्हयाच्या प्रशासकीय यंत्रणेने सज्ज आणि सतर्क राहून काम करावे, परस्परांशी योग्य समन्वय ठेवावा असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. या काळात कोविडसह इतर कोणत्याही स्वरूपाच्या रुग्णसेवेत अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घेतांना धोकादायक इमारती, दरडग्रस्त भाग आणि लोलाईन एरियातील नागरिकांना गरजेनुसार सुरक्षितस्थळी हलवावे अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

अतिवृष्टीच्या या काळात आवश्यक तिथे एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या तुकड्या तैनात कराव्यात, ओएनजीसी सह इतर केंद्रीय संस्थांना या काळात होणाऱ्या अतिवृष्टीची



माहिती देऊन सतर्क राहण्यास सांगण्यात यावे असेही ते यावेळी म्हणाले. हवामान खात्याने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तातडीने मुंबई महानगर क्षेत्र, कोकणातील सर्व जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचा आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते.

## मुख्यमंत्र्यांचा आशा सेविकांशी संवादः कोरोनामुक्त गावासाठी जागरुकता निर्माण करा, आशा सेविकांना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे आवाहन

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेचा धोका मुलांमध्ये असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ही लाट रोखण्यासाठी 'आशा' सेविकांची भूमिका महत्वाची आहे. पालकांनी घाबरून जाऊ नये यासाठी त्यांना आश्वस्त करतानाच कोरोनामुक्त गावासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करावी. गावातील वस्तीची जबाबदारी घेऊन कोरोनामुक्तीसाठी त्यांना मार्गदर्शन करा, असे आवाहन करतानाच आशा सेविकांनी कोरोनाकाळात केलेल्या कामाबद्दल त्यांना मानाचा मुजरा करतो, अशी भावना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज येथे व्यक्त केली.



मुलांमधील कोरोना संसर्ग आणि आशा सेविकांची जबाबदारी या विषयावर बालरोग तज्ज्ञांच्या टास्कफोर्सच्या सदस्यांनी आशा सेविकांशी संवाद साधला. दुरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या या वेबिनारमध्ये मार्गदर्शन करतांना मुख्यमंत्री बोलत होते. मुख्य सचिव सीताराम कुंटे, आरोग्य विभागाचे आयुक्त डॉ. रामास्वामी, बालरोग तज्ज्ञांच्या टास्फोर्सचे अध्यक्ष डॉ. सुहास प्रभू, डॉ. विजय येवले, डॉ. समीर दलवाई, डॉ. आरती किणीकर यांच्यासह राज्यभरातील सुमारे ७० हजार आशा सेविका या ऑनलाईन परिषदेत सहभागी झाले होते. बालरोग तज्ज्ञांच्या टास्कफोर्सने ज्या सूचना केल्या आहेत त्यांची अंमलबजावणी करतानाच कोरोना व्यतिरिक्त एखाद्या आजाराची साथ, लक्षणे आढळल्यास त्याची तातडीने माहिती प्रशासकीय यंत्रणेला द्यावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी आशा सेविकांना केले. बालकांची काळजी घेण्याबाबत पालकांना मार्गदर्शन करावे त्यांनी घाबरून जाऊ नये यासाठी त्यांना आश्वस्त करण्याचे काम आशा सेविकांनी करावे. कुटुंबातील सदस्यांच्या माध्यमातूनच बालकांना कोरोनाचा संसर्ग होऊ नये यासाठी माझे कुटुंब माझी जबाबदारी याबाबत नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे फसव्या बिल्डरांना चाप, वेळेवर घर दिले नाही तर व्याजासह द्यावी लागेल संपूर्ण रक्कम

**मुंबई (विशाल पाटील)-** घर करेदी करणाऱ्यांच्या हिताचा विचार करीत सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. नागरिक पैशाची जमवाजमव करुन आपल्या हक्काचं घर खरेदी करण्याचे स्वप्न बघत असतात. परंतु बिल्डरकडून त्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. मात्र, न्यायालयाने दिलेल्या एका महत्त्वाच्या निर्णयामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाच्या निर्णयानुसार आता बिल्डर घर खरेदी करणाऱ्याला एकतर्फी नियम लादू शकत नाही. ग्राहकाचे हक्क आणि हित लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. न्यायालयाने सांगितले की, घर खरेदी करणारा एकतर्फी नियम व अटी मान्य करण्यास बांधिल नसेल. ग्राहक संरक्षण ॲक्टअंतर्गत न्यायालयाने अपार्टमेंट बायर्स ॲग्रीमेंटच्या अटी एकतर्फी आणि गैरवाजवी, तसेच अनफेअर ट्रेड प्रॅक्टिस असल्याचं



सांगितलं आहे.

न्यायालयाने यासोबत सांगितले की, जर बिल्डरने प्रोजेक्ट वेळेत पूर्ण करुन ग्राहकाला दिला नाही. तर त्याला घर खरेदी करणाऱ्या ग्राहकाला पूर्ण पैसे परत द्यावे लागतील. तेही व्याजासहीत. हे पैसे ९ टक्के व्याजाने ग्राहकाला परत कारावे लागतील, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. गुरुग्राममधील एका प्रोजेक्टवर सुनावणी करताना न्यायालयाने ही टिप्पणी केली आहे. बांधकाम व्यावसायिकाने एक प्रोजेक्ट राष्ट्रीय उपभोक्ता आयोगाच्या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणात न्यायालयाने बांधकाम व्यावसायिकाविरोधात कडक कारवाई केली. हे प्रकरण १ कोटी ६० लाख रुपयांचे आहे. न्यायालयाने सांगितले की, जर या आदेशाचं पालन करण्यात आले नाही, तर या प्रकरणात घर खरेदी करणाऱ्या ग्राहकाला संपूर्ण रक्कम १२ टक्के व्याजासह परत करावी लागेल.

## मुंबईत ४ मजली इमारतीचा भाग कोसळला; वांद्रे परिसरातील घटनेत एकाचा मृत्यु, चौघे जखमी

**मुंबई (नितीन देवळेकर)-** मुंबईत रात्री उशिरा मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली त्याबरोबरच इमारती दुर्घटनाही घडली आहे. वांद्रेमधील खेरवाडी परिसरातील रझाक चाळीत चार मजली घराचा भाग कोसळला. त्यात एका तरुणाचा मृत्यु झाला असून चौघे जण जखमी झाले आहेत. मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. वांद्रे पश्चिम रेल्वे स्टेशनजवळ असलेल्या रझाक चाळीत दाटीवाटीने घरे बनवलेली आहे. जिथे घराचा भाग कोसळला ती जागा अतिशय चिंचोळी आहे. दुर्घटना घडली. त्यावेळी मुंबईत जोरदार पाऊसही सुरु होता. परिणामी अग्निशमन दलाच्या जवानांना ढिगारा हटवण्यासाठी अडचणींचा सामना करावा



लागत होता. अग्निशमन दलाचे जवान ढिगारा हटवण्याचे काम करीत आहेत. ढिगाऱ्याखाली कोणी अडकलेले नाही ना याची खातरजमा केली जात आहे.

अपघातानंतर येथील आमदार झिशान सिद्दीकी यांनी या ठिकाणी भेट दिली. त्यांनी सांगितले की, मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली असून त्यात एकाचा मृत्यु झाला आहे. चार जण जखमी झाले असून जखमींना वेगवेगळ्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पाऊस सुरु असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून परिसरातील वीज पुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आला आहे. स्थानिक तरुणांनी मानवी साखळी करुन ढिगारा हलविण्यासाठी अग्निशामन दलाला मदत करत आहेत.



# मुलांना खरं सांगायची भीतीच वाटते!

संपादक:- राकेश शंकर गोरे

पर्यावरणाकडं लोक जरा जास्त रोखून बघायला लागले, हे खरं; पण सुरुवातीला 'पर्यावरणाचा ऱ्हास केलात ना? आता भोगा शिक्षा!' अशा प्रतिक्रिया होत्या. घरामध्ये स्वस्थ बसून लोक या अशा सोशल मीडिया पोस्ट टाकत होते, तेव्हा शेकडो किलोमीटर्स पायपीट करून असंख्य माणसं हालअपेष्टा सोसत, उपाशीतापाशी स्वत:च्या गावा-घराकडं निघाली होती. शिक्षा भोगण्याबद्दलच्या चर्चा करताना ही विसंगती मला खुपत होती. 'पर्यावरण' म्हटल्यावर त्यातली माणसं त्याचा भाग नाहीत का? मानवी हस्तक्षेप घटल्यामुळं स्वच्छ झालेली तळी नि नद्या, अचानक दिसायला लागलेले पक्षी, यांच्याबद्दलचे उमाळे सर्वसामान्य उच्च मध्यमवर्गीय माणूस असे काही काढतो, जसं पर्यावरणाचा ऱ्हास कोणी दुसऱ्यानं केला होता! जे हे लिहितात ते या ऱ्हासाला व उद्भवलेल्या समस्यांना जबाबदार नसतात का? जानेवारीत २०२० मध्ये जेव्हा आम्ही काही लोकांनी जगभरातले आढावे घेऊन लोकांशी बोलायला, त्यांना सावध करायला सुरूवात केली तेव्हा लोक गांभीर्यानं घेत नव्हते. कोरोनाग्रस्तांची आकडेवारी वाढू लागली तशा चर्चा समोर येऊ लागल्या, की परदेशात साथीचं थैमान खूपच वाढलंय त्यामानानं आपल्याकडं कमी आहे. मुळात त्यावेळी चाचण्या करण्याचं प्रमाण अत्यंत कमी होतं. शिवाय कॉन्टॅक्ट ट्रेसिंग होत नाही तोपर्यंत पूर्ण चित्र समोर येत नाही, हा मुद्दा बऱ्याच ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न मी केला.

पुढच्या लाटेत तीव्र संसर्गानं माणसं मरू लागली तेव्हा आकडे लपवणं सरकारला कठीण होऊन बसलं. पर्यावरण असा शब्द उच्चारला की, माणसासहित पर्यावरण मी मानत असल्यामुळं पर्यावरणाबद्दल भान असणं व सजग कृतीकडं सरकणं या गोष्टींमध्ये अंतर राहतंय. ते ठळक झालं.

'पर्यावरणस्नेही जीवनशैली' नावाची एक कार्यशाळा आम्ही घेतो. त्यावेळी चर्चेचा एक मुद्दा असतो की, आपण संसाधनांचा वापर कमीत कमी करून पर्यावरणावरचा ताण कसा कमी करू शकतो, याचा विचार करायचा! पाणी वाचवणं, कचऱ्याचं वर्गीकरण करणं, हे विचार तिथं सुरू होतात तेव्हा अनेक जण दोन तऱ्हेचे प्रश्न विचारतात, 'आम्ही घरी काम करण्यासाठी येणाऱ्या लोकांना हे कसं पटवून सांगू?' व 'ग्रामीण भागातील लोकांना हे कसं शिकवायचं?'

शहरांमध्ये संसाधनांची उधळमाधळ अधिक होते, तेव्हा ग्रामीण भागात जाऊन समजावण्याची काहीच गरज नाही. घरात काम करायला येणारी बाई दहा घरी काम करत असेल, तर तिचा भर दहा मिनिटांत काम संपवून जाण्याकडं असणार. तुमचं पाणी तिनं वाचवावं म्हणून तिनं दहा मिनिटं वाढवून काम करावं, असं वाटत असेल, तर तिला तिच्या वेळेसाठी वाढवून मेहनताना द्यायला हवा. तिची प्राथमिकता काय आहे, हे समजून न घेता तुम्ही उपाययोजना करणार असाल, तर कठीण आहे. आपल्याला स्वत:च्या सवयी




बदलायच्या नाहीत, म्हणून दुसऱ्याचं नाव पुढं करून आपण सुटू पाहतोय.

पर्यावरणीय प्रश्न निघाले की, बऱ्याचदा गाडी लोकसंख्या वाढीकडं घसरते. जन्मदर संपूर्ण जगभरात कमी होत चाललेला आहे, अशावेळी लोकसंख्या वाढत्या आयुर्मानामुळं फुगून दिसते आहे. मुळात आपल्या समस्येला कुणी अन्य लोक जबाबदार आहेत, हा नजरिया बदलायला हवा आहे. मिनिमलिझम म्हणजेच गरजेपेक्षा एकही गोष्ट जास्तीची न वापरता कमीत कमी संसाधनात निर्वाह करणं! ही गोष्टही कुणीतरी दुसऱ्यांनी करावी असं म्हणणारेच जास्त. कुठल्याही समस्यापूर्तीसाठी आपल्या देशातली मुख्य अडचण ही व्यवस्थापन व नियोजनाबाबतीत आहे. एकट्या माणसाच्या प्रयत्नातून उत्तर शोधता येणं कठीण. उदा. खाजगी गाड्यांचा वापर इतका प्रचंड आहे, त्यामुळं प्रदूषण वाढत आहे. - याचं मूळ आहे गबाळी व नियोजनशून्य सार्वजनिक वाहतूक व्यवस्था. ती सुधारण्याबाबतीत प्रश्न न विचारता खाजगी गाड्यांकडं बोट दाखवणं ही सोपी वाट. असं सगळ्याच प्रश्नांविषयी घडतं आपल्याकडं. ज्या गोष्टीत जनतेनं बदल करायला हवा, त्या बदलासाठी पूरक परिस्थिती निर्माण करणं हे शासनव्यवस्थेचं कर्तव्य व जबाबदारी आहे. त्यासाठी आवाज उठवणं हेही पर्यावरणासाठी काम करणं आहे. प्रत्येक माणसाला पर्यावरणपूरक व आत्मसन्मानानं जगण्याच्या यंत्रणा असत्या व तरीही माणसं उधळमाधळ करत असती, तर मिनिमलिझम वगैरे मुद्दे बोलू. ते आज युरोप अमेरिकेत घडतंय!

## अपघातप्रवण क्षेत्रांत घट

**ठाणे (तृप्ती गोरे)-** ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात अपघातप्रवण क्षेत्रांत घट नोंदविण्यात आली आहे. २०२०पर्यंत या भागांत ५७ अपघातप्रवण क्षेत्रे होती. २०२१मध्ये हे प्रमाण २१ने घटले आहे. वाहतूक पोलीस आणि विविध प्राधिकरणांकडून उपाययोजना केल्या जात असल्याने अपघातप्रवण क्षेत्रे घटल्याचे वाहतूक पोलिसांचे म्हणणे आहे. घट झालेल्या अपघातप्रवण क्षेत्रांत घोडबंदर रोड येथील आठ, भिवंडीमध्ये दहा आणि कळवा, मुंब्रा, डोंबिवली भागातील तीन रस्त्यांचा समावेश आहे. या वर्षी कौसा टोलनाका येथे एका नव्या अपघातप्रवण क्षेत्राची नोंद करण्यात आली आहे.

एकाच ठिकाणी तीन वर्षांत झालेल्या अपघातांमध्ये पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींचा मृत्यू झाल्यास त्या जागेला वाहतूक पोलिसांकडून अपघातप्रवण क्षेत्र घोषित केले जाते. २०१८ मध्ये ठाणे पोलिसांनी अशाचप्रकारे अपघातप्रवण क्षेत्रांची यादी जाहीर केली होती. त्यामध्ये ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी या शहरांत ५७ अपघातप्रवण क्षेत्रांची नोंदी होती. त्यापैकी भिवंडी शहरात २२, घोडबंदर १३, कळवा-मुंब्रा आठ, कल्याण-डोंबिवली आठ, कोपरी, नौपाडा, माजीवडा येथे चार आणि अंबरनाथ येथील रस्त्यांवर दोन अपघातप्रवण क्षेत्रांचा समावेश होता. त्यामुळे या भागात अपघातांमध्ये घट करण्यासाठी वाहतूक पोलीस तसेच विविध प्राधिकरणांकडून उपाययोजना करण्यास सुरुवात झाली होती. रस्त्याकडेला दिशादर्शक, वाहनांचा वेग कमी करण्याचे फलक, गतिरोधक बसविणे, महामार्गाच्या ठिकाणी



अपघाती वळण बंद करण्याच्या उपाययोजनांचा समावेश होता. २१ क्षेत्रांत अपघातांमध्ये तीन वर्षांत पाचहून कमी जणांचा मृत्यू झाला, तर काही ठिकाणी अपघातांचे प्रमाण एक किंवा दोन असे होते. घोडबंदरमध्ये आठ क्षेत्रांची घट गेल्या काही वर्षांपासून कापूरबावडी ते ब्रह्मांड भागात सेवा रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहे. तसेच घोडबंदर मार्गावरील उड्डाण पुलांची दुरुस्ती, वाहनांचा वेग कमी करण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने रस्त्यावर पांढरे पट्टे आखणे त्यामुळे या भागात अपघातांचे प्रमाण कमी झालेले आहे.



## टाळेमुक्तीच्या संभ्रमातून गर्दी

**ठाणे (आकाश कांबळे): राज्याचे आपत्ती निवारण मंत्री विजय वड्डेटीवार यांनी केलेल्या घोषणेमुळे टाळेबंदी हटल्याचा संभ्रम झाल्याने ठाणे शहरातील नागरिक शुक्रवारी सकाळी मोठ्या संख्येने घराबाहेर पडले. या नागरिकांच्या वाहनांचा भार वाढल्यामुळे ठाणे स्थानक परिसर, पूर्व द्रुतगती महामार्ग, घोडबंदर, शिळफाटा यांसह शहरातील अंतर्गत मार्गावर वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र दिसून आले.**

काही ठिकाणी व्यायामशाळाही सुरू झाल्या होत्या, तर काही ठिकाणी दुपारी २ वाजेनंतरही दुकाने खुली होती. तसेच ठाण्यातील मुख्य बाजारपेठेतही नागरिकांनी खरेदीसाठी गर्दी केल्याने जांभळीनाका तसेच आसपासच्या परिसरातील रस्त्यांवर कोंडी झाली होती.

करोनाबाधितांचा आकडा कमी झाल्यामुळे काही निकषांच्या आधारे राज्यातील १८ जिल्ह्यामधील निर्बंध हटविण्यात आल्याची घोषणा आपत्ती निवारण मंत्री विजय वडेट्टीवार यांनी केली. मात्र असा कोणताही निर्णयच झाला नसल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाने काही वेळातच स्पष्ट केले. परंतु मंत्री वडेट्टीवार यांनी केलेल्या घोषणेचे संदेश समाजमाध्यमांवर वेगाने प्रसारित झाले आणि या संदेशामुळे सारे निर्बंध शिथिल झाल्याचा नागरिकामध्ये समज निर्माण झाला. यातूनच ठाणे शहरातील अनेक नागरिक सकाळी कामानिमित्त मोठ्या संख्येने घराबाहेर पडले. गेल्या काही दिवसांपासून ओस पडलेल्या रस्त्यांवर नागरिकांच्या वाहनांचा भार वाढून ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाली. ठाणे शहरातील मुंबई-नाशिक महामार्ग, घोडबंदर आणि शिळफाटा या मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. या कोंडीत अडकून पडल्याने अनेकांचे हाल झाले. मुंबई-नाशिक महामार्गावरील कॅडबरी नाक्यावर दोन वाहनांची धडक होऊन अपघात झाला, तर तीन हात नाका परिसरात टँकर बंद पडला होता. यामुळे वाहतूक कोंडीत भर पडली. महामार्गावर झालेल्या कोंडीचा फटका शहरातील अंतर्गत मार्गांना बसून या ठिकाणीही कोंडी झाली होती. ठाण्यातील बाजारपेठेतही नागरिकांनी खरेदीसाठी गर्दी केली होती. अनेकजण बाजारपेठेत दुचाकी घेऊन आले होते. यामुळे बाजारपेठेतील वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कोंडी झाली. त्याचा फटका जांभळीनाका, शिवाजी पथ, कोर्टनाका, ठाणे स्थानक परिसरातील रस्ते वाहतुकीला बसला. ठाणे महापालिकेने निर्बंध शिथिल केल्यामुळे बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची गर्दी वाढली आहे.

## करोनामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या प्रमाणात घट

**ठाणे (सतिश सोनावणे)-** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून करोना रुग्णसंख्या कमी होऊ लागली असून त्यापाठोपाठ आता गेल्या चार दिवसांपासून मृत्यूचे प्रमाणही कमी होऊ लागले आहे. चार दिवसांपूर्वी जिल्ह्यात दररोज ५० ते ६० रुग्णांचा मृत्यू व्हायचा. आता दररोज सरासरी ३५ ते ४५ रुग्णांचे मृत्यू होत आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य विभागाकडून देण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात रुग्णसंख्येत घट होऊ लागली असून आता दररोज ५०० ते ६०० रुग्ण आढळून येते आहेत. सद्यस्थितीत ७ हजार ४६८ उपचाराधीन रुग्ण आहेत. रुग्णसंख्या कमी होत असली तरी मृत्यूचे प्रमाण कमी होत नव्हते. उलट मृत्यूची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसत होती. दररोज सरासरी ५० ते ६० जणांचा मृत्यू होत होता. त्यामध्ये सहव्याधी आणि रुग्णालयात



उशिराने उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णांचा समावेश होता. त्यामुळे रुग्णसंख्या कमी करण्याबरोबरच मृत्यूचे प्रमाण कमी करण्याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी जिल्हा तसेच महापालिका प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यामध्ये करोनाबाधिताला तात्काळ रुग्णालयात दाखल करणे, सहव्याधी असलेल्या रुग्णांच्या प्रकृतीकडे दररोज लक्ष ठेवणे, रुग्णाला प्राणवायूची आवश्यकता असेल तर त्याला त्याप्रमाणे रुग्णशय्या उपलब्ध करून देणे, अशा विविध उपाययोजनांचा समावेश आहे. या उपाययोजनांमुळे मृतांच्या संख्येत घट होत असल्याचे जिल्हा आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले. वेळेवर रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले नाही तर मृत्यू होऊ शकतो, या भीतीतून अनेक रुग्ण वेळेवर रुग्णालयात उपचारासाठी दाखल होत आहेत.

## उल्हास नदीवरील जलपर्णीचा विळखा सैल

**उल्हासनगर (शकिल शेख)-** गेल्या काही दिवसांपासून उल्हास नदीच्या वरप, कांबा, आपटी या भागांतील जलपर्णी सैल होऊ लागल्याचे दिसून आले आहे. जलपर्णीवर प्रक्रिया केल्याने जलपर्णीचा विळखा सैल झाला असून ती आता पिवळी पडू लागली आहे. येत्या काही दिवसांत ही जलपर्णी नष्ट होण्यास सुरुवात होईल, असे या प्रकल्पाचे प्रमुख चंद्रशेखर भडसावळे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, कल्याण-डोंबिवली महापालिका आणि उल्हासनगर महापालिका आयुक्तांसह अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी याठिकाणी भेट दिली होती. त्यानंतर सगुण रुरल फाऊंडेशनच्या मदतीने या जलपर्णीवर जैव तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उल्हास नदी जलपर्णीमुक्त करण्याची मोहीम सुरू करण्यात आली होती. याच्या पहिल्या टप्प्यात



यांनी स्पष्ट केले आहे. काही आठवड्यांपूर्वी उल्हास नदीतील जलपर्णी काढण्यासाठी नदीपात्रात मोठे आंदोलन झाल्यानंतर त्याची दखल घेत जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे आणि जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी जलपर्णी काढण्यासाठी सगुणा रुरल फाऊंडेशनची मदत घेत कामाला सुरुवात केली होती. उल्हास नदीत मिसळणाऱ्या नागरी आणि औद्योगिक सांडपाण्यामुळे नदी प्रदूषित होत असून त्यामुळे नदीपात्रात जलपर्णी तयार होत असल्याचे समोर आले होते. मी कल्याणकर सामाजिक संस्थेचे नितीन निकम यांनी नदीपात्रात या जलपर्णी काढण्यासाठी मोठे आंदोलन केले होते. त्याची दखल घेत जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे, उल्हास नदीच्या रायते येथील पात्रात विविध प्रकारचे मासे सोडण्यात आले होते. त्यानंतर या जलपर्णीवर प्रक्रिया करण्यास सुरुवात करण्यात आली होती. त्यात मोहने बंधारा, वरप, कांबा, आपटी येथील बारवी आणि उल्हास नदीचा संगम आणि बदलापूर या भागांत जलपर्णीवर प्रक्रिया करण्यात आली. मे महिन्याच्या मध्यावधीत ही प्रक्रिया केल्यानंतर जून महिन्याच्या सुरुवातीलाच वरप, कांबा या भागांतील जलपर्णी सैल होण्यास सुरुवात झाल्याचे दिसून आले आहे. जलपर्णीचे घट्ट आच्छादन हळूहळू वेगळे होत असून जलपर्णीचा रंग बदलून पिवळा होऊ लागल्याचे उल्हास नदी बचाव कृती समितीचे अश्विन भोईर यांनी सांगितले आहे.

## गडचिरोली सहाय्यक जिल्हाधिकारी श्री आशिष येरेकर यांच्या अनेक नाविन्यपूर्ण उपकरणातून मिळते एक नवी दृष्टी

सध्याच्या covid-19 च्या पार्श्वभूमीच्या काळात अनेक लोक हे कित्येक समस्येतून जात आहेत त्यातही ग्रामीण भाग हा नेहमी विकासाच्या दृष्टीने कायम दुर्लक्षित होत जातो, मात्र अशा परिस्थितीमध्ये देखील गडचिरोली सहाय्यक जिल्हाधिकारी श्री आशिष येरेकर यांनी अथक परिश्रमातून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून त्यांच्या जीवनात आशेचे किरण उभे केले आहे.

आपण सर्वांनी पॅडमॅन चित्रपट बघितला असणारच आणि तो चित्रपट ज्यांच्या प्रेरणेने घडला ते म्हणजे श्री मुरुगगनाथम तामिळनाडू, यांच्या मदतीने श्री आशिष येरेकर यांनी गडचिरोली गडचिरोली तील आदिवासीबहुल भागात तिथल्या इथल्या लोकांना मासिक पाळी विषयी विविध उपक्रमातून जनजागृती केली, तसेच सॅनिटरी पॅड निर्माण करणाऱ्या मशीन तिथल्या मुलींच्या आश्रम शाळेत उभारल्या त्यामुळे तिथल्या मुलींमध्ये बऱ्याच प्रमाणात मासिक पाळी मध्ये पाळवयाची स्वच्छता निर्माण झाली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रेरणेतून त्यांच्या कमवा आणि शिका ही योजना राबविण्याचा ते प्रयत्न करत आहेत त्यांचा मुख्य उद्देश म्हणजे मुलांमध्ये इंटरप्रेनेऊर्शिप विचार कमी वयातून अश्रू जावा, त्यांना निर्मितीचा आनंद मिळावा व काही सामाजिक समस्येचे निराकरण करता यावे. विद्यार्थ्यांना समजण्यास अडचण येऊ नये म्हणून त्यांनी अभ्यासक्रमाचे मराठी व इंग्रजी सोबतच, त्याचे गोंडी माडिया मधे भाषांतर दिले, ज्याचे मुलांसमोर वाचन करून शिक्षक त्यांना समजाऊन सांगू शकतील



इयत्ता १ ली ते ३ री च्या मराठी व इंग्रजी च्या पुस्तकांचे मराठी मधे भाषांतर केले.

याचा उद्देश असा कीआदिवासी घरांमध्ये गोंडी/माडीया ह्या भाषा बोलली जाते. जेंव्हा अशा परिवारातील मुले शाळेत येतात त्यांना भाषेचा न्यूनगंड निर्माण होतो व त्यांची अभ्यासाची गोडी निर्माण होण्यास विलंब होतो. अशा मुलांसाठी त्यांनी एक ब्रिज कोर्स डिझाईन केला आहे. ASER report जो दरवर्षी प्रथम नावाच्या एनजीओ कडून प्रकाशित केला जातो, त्यामध्ये हे नेहमी सांगितल्या जाते की, ५ वी च्या मुलांना ३ री चे पुस्तक वाचता येत नाही, वाचता आला तर त्याचं आकलन होत नाही. अशीच परिस्थिती आश्रम शाळेमधील मुलांची पण पाहायला मिळते. यासाठी एक प्रयत्न म्हणून, त्यांनी २ परीक्षा टार्गेट करण्याचे ठरवले, त्या म्हणजे ५ वी मध्ये दिल्या जाणाऱ्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा तसेच स्कॉलरशिप परीक्षा. परंतु, या परीक्षांची तैयारी आम्ही ३ री पासूनच सुरु करणार. ३ री व ४ थी चे तसे workbooks आम्ही या लॉकडाऊन च्या काळात शिक्षकांकडून तैयार करून घेतले. अशा या workbooks मुळे, एक तर मुलांचे बेसिक कॉन्सेप्ट तर नीट होतीलच, पण ASER ने उल्लेखित केलेला आकलनाचा मुद्दा देखील सुटण्यास मदत होईल. कारण त्या वर्कबुक्स मधे, सगळ्या प्रकारचे प्रश्न आहेत जसे, उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्न, बुद्धिमत्ता चाचणीचे प्रश्न, गणिताचे प्रश्न इ. तसेच इ. ७ वी ते १० वी च्या विद्यार्थांसाठी लातूर येथील नामांकित कोचिंग क्लास च्या मदतीने फाउंडेशन कोर्स तयार करण्याचे काम सुरू आहे. या कोर्स मधे मुलांना, सायन्स व गणित या विषयांचे धड्यानुसार, Objective Questions solve करून घेण्यात येईल, जेणे करुन त्यांचे basic concepts क्लिअर होतील व, त्यांची Objective Questions बद्दलची भीती कमी होईल, जी त्यांना ११वी व १२ वी मध्ये कामाला येईल, जेंव्हा ते नीट किंवा जे इ इ ची तयारी करतील. आश्रम शाळेतील ११ वी व १२ वी च्या मुलांसाठी MBBS ( NEET ) ke IIT (IIT JEE) ची तयारी करून घेण्यासाठी नांदेड व लातूर च्या अग्रणी कोचिंग क्लासेस च्या मदतीने ऑनलाईन क्लासेस सुरू केले. आज पर्यंत आदिवासी आश्रम शाळांमधून डॉक्टर किंवा इंजिनिअर होण्याचे प्रमाण नगण्य आहे. अशा कोचिंग ने हे चित्र बदलण्याची अशा आहे.

## सीसीटीव्ही प्रकल्प कंत्राटाच्या विरोधात जनमत

**नवी मुंबई (धनश्री सट्टा):** शहरातील सर्व मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या कामाची निविदा वादग्रस्त ठरत असून या विरोधात जनमत तयार होत आहे. ऐरोलीचे आमदार गणेश नाईक यांनी या वाढीव निविदेच्या विरोधात विधानसभेत आवाज उठविणार असल्याचे जाहीर केले आहे. या कामासाठी तीन निविदा आल्या असून सर्वात कमी दराची निविदा २७१ कोटी रुपये खर्चाची आहे. शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक असल्याने ही निविदा दर कमी करून देण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून या निविदेला न्यायालयात आव्हान दिले जाणार असल्याचे काही सामाजिक कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यासाठी ही निविदा कार्यादेश देण्याची प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. पालिकेने दोन वर्षांपूर्वी जूनमध्ये ही निविदा एका तांत्रिक सल्लागाराच्या मदतीने तयार केली असून त्याची किंमत १५४ कोटी ३४ लाख निश्चित करण्यात आली आहे. दोन वेळा या कामात कोणत्याही कंत्राटदारांने रस घेतलेला नाही. त्यामुळे निविदा पूर्व बैठकीत या कामात आणखी काही कामांचा समावेश करण्यात आला असून कंत्राटदाराला दर लावण्याचा मुक्त वावर देण्यात आला आहे. त्यामुळे काही दिवसांपूर्वी आलेल्या या निविदेसाठी तीन कंत्राटदारांनी रस दाखविला असून सर्वात कमी निविदा ही थेट १५५ कोटीवरून २७१ कोटीची बोली लावण्यात आली आहे. या निविदेचा दर १८० कोटीपर्यंत खाली आणण्यासाठी कंत्राटदारांवर प्रशासन चर्चा करीत आहे, पण २४० कोटीपेक्षा कमी दरात नमूद सीसीटीव्ही यंत्र सामुग्री लावता येणार नाही असे कंत्राटदारांनी स्पष्ट केल्याचे समजते. हे काम मिळावे यासाठी कंत्राटदाराने अनेक ठिकाणी भोग लावलेले आहेत. त्यामुळे निविदा कमी दरात स्वीकारणे शक्य होणार नसल्याचे समजते. त्यामुळे वादग्रस्त ठरणारी ही निविदा रद्द करून ऐनवेळी नमूद करण्यात आलेल्या तांत्रिक खर्चाला रितसर शासकीय मान्यता घेऊन नंतर निविदा काढण्यात यावी असे मत पालिकेच्या अभियंत्यांनी व्यक्त केले आहे. सरकारमधील दोन मंत्र्यांचा दबाव असल्याने या निविदेचे कार्यादेश लवकरात लवकर देण्याची घाई केली जात आहे. व्हिजेटीआय, आयआयटी, आणि सिडॅक अशा मान्यताप्राप्त संस्थांचा अभिप्राय मागविला आहे. या संस्था या केवळ मूळ निविदेवर आपला अभिप्राय व्यक्त करण्याची शक्यता आहे. या निर्णयाचे आदेश निघण्याची वाट काही सामाजिक कार्यकर्ते पहात आहेत.



Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)



# मुंबईच्या वीस टक्के किनारपट्टीला पुराचा अतितीव्र धोका

**मुंबई (योगेश होळंब)-** समुद्राच्या पाणी पातळीतील वाढीचा मुंबईच्या किनारपट्टीला असलेला धोका या विषयावर नुकतेच एक संशोधन झाले. त्यानुसार १९७६ ते २०१५ दरम्यान जमिनीच्या उपयोगात केलेले बदल, दलदल, पाणीसाठे आणि खारफुटीच्या जंगलांचा विध्वंस करणाऱ्या अशाश्वत विकासामुळे मुंबई किनारपट्टीचा सखल भाग हा समुद्राच्या वाढत्या पाणी पातळीमुळे अतिसंवेदनशील बनला असून, यामुळे मुंबईच्या वीस टक्के किनारपट्टीला पुराचा अतितीव्र धोका आहे. उत्तरेला मीरा-भाईंदरपासून दक्षिणेला अलिबागपर्यंतचा भाग समाविष्ट असलेल्या या संशोधनात मुंबई महानगर प्रदेशाची विशेषतः दक्षिण आणि पूर्व उपनगरांतील ५०.७५ किलोमीटरची किनारपट्टी अतिसंवेदनशील बनली आहे. जागतिक तापमानवाढीमुळे समुद्राच्या वाढत्या पातळीचा थेट परिणाम म्हणून भविष्यात या भागात दरवर्षी पूर संभवतो, असा इशारा अभ्यासाअंती देण्यात आला. बोरिवली आणि अंधेरीसारखे भाग कमी संवेदनशील असतील तर गोराई (मुंबई), उत्तन, उरण आणि अलिबाग (रायगड) हे भाग मध्यम ते तीव्र संवेदनशील असतील. हा संशोधन अभ्यास तज्ज्ञांच्या तपासणीनंतर विज्ञानविषयक प्रकाशनात प्रसिद्ध करण्यात आला. जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी, दिल्ली, एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, थायलंड, देशप्राण कॉलेज ऑफ टिचर्स एज्युकेशन, मेदिनीपूर, पश्चिम बंगाल आणि स्कूल ऑफ प्लॅनिंग अँड आर्किटेक्चर, भोपाळ या संस्थांमधील संशोधकांनी यात सहभाग घेतला. मुंबई किनारपट्टीच्या या समस्येची तीव्रता कमी करण्यासाठीचे धोरण आखण्यासाठी वरील अभ्यासाचे निष्कर्ष मार्गदर्शक म्हणून वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे. संशोधकांच्या मतानुसार, उच्चस्तरीय विकासकामे आणि दर वर्ग किलोमीटरमधील वाढत्या लोकसंख्येमुळे किनारपट्टीची झीज होत आहे. पर्यटन आणि मासेमारीसारख्या कृतींमुळे विशेषतः दक्षिण आणि पूर्व उपनगरांच्या किनारपट्टीवर विपरीत परिणाम होत आहेत.

## ...तर वेगळा विचार करणार; मनसे-भाजपा युतीबाबत फडणवीसांनी केलं भाष्य, पुन्हा रंगल्या चर्चा

**मुंबई (राकेश गायकवाड)-** आगामी महापालिकेच्या निवडणूकीत भाजपा आणि मनसे यांची युती होणार की नाही, यासंदर्भात गेल्या काही दिवसांआधी चर्चा सुरु होती. त्यांनंतर आता विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी एका वेबिनारमध्ये युतीबाबत केलेल्या वक्तव्यानंतर राज्यात पुन्हा एकदा भाजपा आणि मनसेच्या युतीबाबत चर्चा रंगू लागल्या आहेत. एका वेबिनारमध्ये बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मनसेने हिंदुत्व थोड्या प्रमाणात स्वीकारलंय किंवा स्वीकारत आहेत. आम्ही हिंदुत्ववादी आहोत पण आमचा अजेंडा व्यापक आहे. जी काही क्षेत्रीय अस्मिता असते ती आमच्याकडे आहे. आम्ही महाराष्ट्राच्या हिताचाच विचार करु. पण



क्षेत्रीय अस्मितेसोबत आम्हाला राष्ट्रीय अस्मिताही आम्हाला महत्वाची आहे. त्यामुळे क्षेत्रीय अस्मितेसाठी म्हणजेच मराठी माणसावर अन्याय होऊ देणार नाही. पण मराठी माणसावर अन्याय होऊ द्यायचा नाही यासाठी दुसऱ्यावर अन्याय करायचा आणि आम्ही मराठी माणसावर अन्याय होऊ देत नाही अशी भूमिका घ्यायचं आम्हाला योग्य वाटतं नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. क्षेत्रीय अस्मिता एक नंबरवर असली तरी राष्ट्रीय अस्मिता विसरता येणार नाही, या मताचे आम्ही आहोत. ही मतं आता तरी आमची आणि मनसेची वेगवेगळी आहेत, असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. तसेच ती मतं जुळली तर वेगळा विचार करणार, पण आज तरी ती जुळत नाहीत. ती जुळत नसली तर युतीचा कोणता प्रश्नच निर्माण होत नाही, असंही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केलं आहे.

## कोरोना काळातला मास्क, पीपीई किटही पर्यावरणाला घातकच

**मुंबई (विशाल पाटील)-** पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आपण आता प्लास्टिकचा वापर कमी केला पाहिजे. कोरोनाशी लढताना आपण अनेक



प्लास्टिकच्या घटकांचा वापर करत आहोत. यात मास्कपासून पीपीई किटचा समावेश आहे. हे घटकही पर्यावरणाला घातक आहेत. केवळ आताच नाही, तर गेल्या कित्येक वर्षांपासून आपण प्लास्टिक मोठ्या प्रमाणावर वापरत असून, यामुळे समुद्राची, जलचरांची मोठी हानी झाली आहे, अशी खंत तज्ज्ञांनी व्यक्त केली.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून इंडिया इंटरनॅशनल सेंटरच्यावतीने 'परिसंस्थेचे पुनरुज्जीवन : कोरोना आणि समुद्र' या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे माजी सल्लागार डॉ. एम. सुधाकर, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या सेवानिवृत्त शास्त्रज्ञ डॉ. मालती गोयल आणि अॅकेडमी ऑफ सायंटिफिक अँड इनोव्हेटिव्ह रिसर्चचे माजी मुख्य शास्त्रज्ञ डॉ. एन. रामय्या नागप्पा या वेबिनारमध्ये सहभागी झाले होते. डॉ. मालती गोयल यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासाठी काय करता येईल? याचे महत्त्व पटवून दिले.

## सव्वा दोन वर्षांत मुंबई रेल्वे हद्दीत ४० हजार चोऱ्या

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** उपनगरीय मार्गावर लोकल पकडण्यासाठीची धावपळ, गर्दी या मनस्तापात स्थानक हद्दीत होणाऱ्या चोऱ्यांचीही भर पडल्याचे दिसत आहे. मध्य व पश्चिम रेल्वे उपनगरीय मार्गावर जानेवारी २०१९ पासून ते एप्रिल २०२१ पर्यंत तब्बल ४० हजार ४५७ चोरीच्या तक्रारी झाल्या असून त्या तुलनेत गुन्ह्यांचा छडा लावण्याचे प्रमाण फारच कमी असल्याचे दिसत आहे. फक्त ४ हजार ७६२ गुन्ह्यांचा तपास करण्यातच पोलिसांना यश आले आहे. आतापर्यंत ५ हजार ६३ आरोपींना अटक केली असून चोऱ्या रोखण्याचे मोठे आव्हान लोहमार्ग पोलिसांसमोर आहे. उपनगरीय रेल्वेत गुन्ह्यांना आळा घालण्याची जबाबदारी लोहमार्ग पोलिसांकडे असून रेल्वे सुरक्षा दलाकडे रेल्वेच्या मालमत्तेची सुरक्षा राखणे आणि लोहमार्ग पोलिसांना गुन्हे तपासकामात मदत



करण्याची जबाबदारी आहे. रेल्वे प्रवाशांची सुरक्षा नेहमीच कळीचा मुद्दा राहिला असून कमी मनुष्यबळामुळे प्रवाशांची सुरक्षा करताना लोहमार्ग पोलीस व रेल्वे सुरक्षा दलाची नेहमीच दमछाक होते, तरीही प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सज्ज असल्याचा दावा या दोन्ही पोलीस विभागांकडून केला जातो. मात्र चोरीच्या घटनांच्या संख्येने हा दावा खोटा ठरवला आहे. मोबाइल चोरी, पाकीटमारी, सोन्याच्या चैन आणि मंगळसूत्र चोरीबरोबरच प्रवाशांच्या लोकल डब्यातील बॅग लंपास करण्याचे गुन्हे लोकल प्रवासात घडतात. त्याबद्दल प्रवाशांकडून तक्रारी दाखल केल्या जातात. परंतु गुन्ह्यांचा यशस्वी तपास करून प्रवाशांच्या वस्तू मिळवण्याचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे दिसत आहे. जानेवारी २०१९ ते एप्रिल २०२१ पर्यंत ४०,४५७ विविध चोऱ्यांची नोंद लोहमार्ग पोलिसांकडे झाली. यात अवघ्या ४,७६२ गुन्ह्यांचा तपास करण्यात यश आले. या कालावधीत मध्य रेल्वेवर गुन्ह्यांचे प्रमाण अधिक राहिले असून २६,४४८ चोऱ्या व २,८०७ चोऱ्यांच्या तपासात गुन्हेगारांना अटक केली आहे.

## मुंबई पालिकेला लस पुरवठादार मिळेना; सर्व ९ निविदा रद्द! आता स्पुटनिक व्ही'साठी प्रयत्न सुरू!

**मुंबई (सम्यक कासारे)-** केंद्र सरकारने जाहीर केलेल्या टप्प्यांनुसार मुंबईतील १८ वर्षे वयोगटापुढच्या सर्वांना लस देण्यासाठी मुंबई महानगर पालिकेने थेट लस पुरवठादारांकडून लस खरेदीची तयारी सुरू केली होती. मात्र,



त्यात मोठा अडथळा आला असून त्यामुळे मुंबईकरांना लस पुरवठादार मिळण्यात अजून अडचणी निर्माण झाल्या आहेत. मुंबई महानगर पालिकेनं लस पुरवठ्यासाठी जारी केलेल्या ग्लोबल टेंडरला प्रतिसाद म्हणून आलेल्या सर्व ९ निविदा पालिका प्रशासनाने रद्द केल्या आहेत. या निविदांसोबत आवश्यक असलेली कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली नसल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचं पालिकेकडून सांगण्यात आलं आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा लस पुरवठ्यासाठी पालिकेकडून प्रयत्न सुरू झाले असून स्पुटनिक व्हीच्या पुरवठ्यासाठी डॉ. रेड्डीच लॅबोरेटरीजसोबत चर्चा सुरू असल्याचं पालिकेकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

मे महिन्यात मुंबई महानगर पालिकेनं करोनाच्या लसीचे एक कोटी डोस मिळवण्यासाठी ग्लोबल टेंडर जाहीर केलं होतं. यासाठी पालिकेकडे एकूण ९ लस पुरवठादारांच्या निविदा सादर झाल्या. यापैकी ८ निविदा या स्पुटनिक व्ही लसीच्या पुरवठ्यासाठी होत्या तर एक निविदा ही फायझर आणि अॅस्ट्राझेनेका लसीच्या पुरवठ्यासाठी होती. मात्र, त्यांनी सादर केलेली कागदपत्र पालिकेच्या निकषांनुसार अपुरी असल्यामुळे या निविदा रद्द करण्यात आल्या आहेत.

## गणेशोत्सवाबाबत संभ्रम

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** अवघ्या शंभर दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवातील नियमावलीचे त्रांगडे अद्याप कायम असून मूर्तीची उंची आणि प्लास्टर ऑफ पॅरिसचा (पीओपी) वापर या मुद्द्यांबाबत संभ्रम आहे. मंडळांनी मूर्तिकारांकडे मागणी नोंदवण्यास सुरुवात केली असली तरी सरकारी नियमावली जाहीर झाली नसल्याने मूर्तिकारांचा खोळंबा झाला आहे. जून महिना उजाडला की मर्तिकार, गणेश मंडळे यांना गणेशोत्सवाचे वेध लागतात. ठिकठिकाणी मूर्तिकारांच्या कार्यशाळा उभ्या राहतात, तर कुठे आयत्या गणेशमूर्तींनी दुकाने सजतात. परंतु यंदा मागणी असूनही अद्याप मूतकारांनी मूर्ती घडवण्यास सुरुवात केलेली नाही. गेल्या वर्षी राज्य सरकारने उशिरा नियमावली जाहीर केल्याने मूर्तिकारांचे नुकसान झाले. शासनाने पीओपी बंदी लागू केल्याने माती कुठून आणायची, कशी आणायची अशा अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. यंदा हा गोंधळ टाळण्यासाठी



मूतकारांना राज्य सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांची प्रतीक्षा आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची लगबग तीन महिने आधीपासूनच सुरू होत असल्याने सभा, बैठका घेऊन मंडळे मूर्तीसाठीची आगऊ नोंदणी करण्यासाठी मूर्तिकारांशी चर्चा करत आहेत. दरवर्षीचा शिरस्ता मोडून गेल्या वर्षी मंडळांनी मूर्तीची उंची ४ फु टांपर्यंत मर्यादित ठेवली. परंतु यंदा तरी उंच मूर्ती साकारल्या जाव्यात यासाठी मंडळांची धडपड सुरू आहे. 'गतवर्षी परिस्थिती बिकट असल्याने मंडळांनी सरकारच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले. सध्याची परिस्थिती बघता करोनावर लस उपलब्ध आहे. तसेच मुंबईमध्ये परिस्थिती नियंत्रणात आहे. त्यामुळे यावर्षी उंचीची मर्यादा न लादता उत्सव साजरा करण्यास परवानगी देण्यात यावी. नियमावली जाहीर करताना मंडळांनाही विचारात घ्यावे,' असे तेजुकाया सार्वजनिक गणेशोस्तव ट्रस्टचे अध्यक्ष सुशांत शिंदे यांनी सांगितले. गेल्या वर्षी पोओपीच्या मूर्तींना उशिरा परवानगी मिळाली. परंतु सर्वाधिक विक्री ही पीओपीच्याच मूर्तीची झाल्याचे एकूण मूर्तिकारांशी झालेल्या चर्चेतून दिसते.

## 'बेस्ट'मधील प्रवासी निर्बंध हटवा!

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** दुसऱ्या लाटेत करोना रुग्णांची संख्या वाढली आणि ५० टक्के प्रवासी क्षमतेने वाहतूक करण्याचे निर्बंध मुंबईतील बेस्ट बसवर आले. निर्बंध असले तरीही पर्याय नसल्याने मुंबईतील काही मार्गावर प्रवासी बेस्टमधून प्रवास करण्याचा आटोकाट प्रयत्न करत असून त्यामुळे बेस्ट अधिकारीही हतबल झाले आहेत. अत्यावश्यक सेवा कर्मचाऱ्यांसाठीच असलेली लोकल, एसटीच्या कमी झालेल्या गाड्या आणि बेस्ट प्रवाशांची गैरसोय पाहता ५० टक्के क्षमतेने प्रवासी वाहून नेण्याचा पुनर्विचार करा, अशी मागणी बेस्ट उपक्रमाने मुंबई पालिकेकडे केली आहे. ही मागणी पालिका राज्य शासनाकडे करेल, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. मुंबई महानगरात करोनाबाधितांची संख्या वाढू लागल्याने राज्य सरकार व पालिकेने निर्बंध कठोर केले. रिक्षा, टॅक्सींतील प्रवासी संख्येवर निर्बंध घालण्यात आले



तर लोकलमधून अत्यावश्यक सेवा कर्मचाऱ्यांनाच प्रवासाची मुभा देण्यात आली. मुंबईत धावणाऱ्या बेस्टमधूनही ५० टक्के क्षमतेने प्रवासी वाहतूक आणि उभ्याने प्रवासी वाहून न नेण्याचा नियम लागू केला. परंतु सामान्यांना लोकलमधून प्रवासाची मुभा नसल्याने अनेक जण बेस्टकडे वळू लागले. परंतु निर्बधांमुळे चालक, वाहक जादा प्रवासी घेण्यास नकार देऊ लागले. यारून बरेच वादही प्रवासी व चालक, वाहकांमध्ये होत आहेत. बेस्टच्या मदतीसाठी त्यांच्या मार्गावर एसटीच्या गाड्यांची संख्याही कमी करण्यात आली. त्यामुळे कामानिमित्त बाहेर पडलेल्या सामान्य प्रवाशांची आणखी गैरसोय होऊ लागली.

काही मार्गावर सकाळी व सायंकाळी गर्दीच्या वेळी बेस्ट बसगाड्यांना गर्दी होऊ लागली असून प्रवासीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नसतात. एका आसनावर दोन प्रवासी व उभ्यानेही प्रवासी प्रवास करू लागले आहेत.

## एसटीच्या निवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांची १६० कोटींची देणी थकली

**मुंबई (विशाल कारंडे)-** एसटी महामंडळातील अंदाजे सहा हजार पाचशे कर्मचारी व अधिकाऱ्यांची सन २०१९ पासून निवृत्तीनंतर मिळणारी शिल्लक रजेची रक्कम तसेच त्यांच्या वेतनवाढीच्या फरकाच्या ४८ हप्त्यांपैकी शिल्लक राहिलेली रक्कम असे अंदाजे १६० कोटी रुपये महामंडळाकडे थकीत असून एसटी महामंडळाकडे निधीची कमतरता असल्याने सदरची रक्कम सदर कर्मचाऱ्यांना मिळणे बाकी आहे. राज्य सरकारकडून निव्वळ निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी देण्यासाठी एसटी महामंडळास



तात्काळ शासनाकडून आर्थिक साहाय्य मिळावे, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे म्हणाले की, निवृत्त सहा हजार पाचशे कर्मचारी व अधिकाऱ्यांपैकी, अंदाजे ५१ कर्मचारी व अधिकारी मृत्यू पावल्याची माहिती समोर आली असून यामध्ये कोरोनामुळे मृत्यू होणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. निवृत्तीनंतरची सर्व देणी तात्काळ देण्याचे परिपत्रक असताना महामंडळात निवृत्त कर्मचारी व अधिकाऱ्यांना त्यांची थकीत देणी मिळालेली नाहीत, हे अन्यायकारक असून मुळात इतरांच्या तुलनेत एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन कमी आहे.

# १७ गिरणी कामगारांच्या घरांवर बुलडोझर

**मुंबई (राकेश गायकवाड)-** दक्षिण मुंबईमधून जलदगतीने पश्चिम उपनगरांमध्ये पोहोचण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या सागरी किनारा मार्गावरील एका जोडपुलाआड येत असलेल्या १७ गिरणी कामगारांच्या घरांवर बुलडोझर फिरविण्याची तयारी पालिकेने सुरू केली आहे. या जोडपुलामुळे महालक्ष्मी येथील मॉडर्न मिल कम्पाऊंडमधील सातपैकी एक चाळ काळाच्या पडद्याआड जाण्याची चिन्हे आहेत.

दक्षिण मुंबईमधील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी काळबादेवी येथील प्रिन्सेस स्ट्रीट ते कांदिवली दरम्यान सागरी किनारा मार्ग प्रकल्प उभारण्यात येत आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. प्रिन्सेस



स्ट्रीट ते वरळी-वांद्रे सागरीसेतूदरम्यान पहिल्या टप्प्यातील मार्गाच्या उभारणीचे काम मुंबई महापालिकेने सुरू केले आहे. या मार्गावरून काही जोडरस्ते शहरातील विविध भागांमध्ये जाणार आहेत. त्यासाठी पुलांची उभारणी करण्यात येणार आहे. महालक्ष्मी परिसरातील सात रस्त्यानजिक प्रस्तावित पूल सागरी किनारा मार्गाला जोडण्यात येणार आहे. हा पूल केशवराव खाड्ये मार्गावरून जात आहे. या मार्गावरील मॉडर्न मिल कम्पाऊंडमधील १७ कुटुंबीयांची एक चाळ पुलाला अडथळा बनली आहे. त्यामुळे पालिकेने या चाळीला नोटीस बजावली आहे.

ब्रिटिश काळातील पूर्वाश्रमीच्या गार्डन मिलमधील कामगारांच्या वास्तव्यासाठी बोमेनजी पपेटी यांनी महालक्ष्मी परिसरात बैठी घरे बांधली होती. येथे सहा चाळी १९०२ च्या सुमारास उभ्या राहिल्या. मिलमधील कामगारांची वाढती संख्या लक्षात घेऊन १९३० तेथेच एक दुमजली इमारतही बांधण्यात आली. या कामगार वसाहतींमध्ये १५६ कामगारांची कुटुंबे गेली अनेक वर्षे वास्तव्यास आहेत. मात्र आता सागरी किनारा मार्ग प्रकल्पामुळे १७ कुटुंबीय अडचणीत आले आहेत.

गिरणी कामगारांच्या या वसाहतीचा पुनर्विकास करण्याचा मालकाचाही मानस आहे. मात्र आता सागरी किनारा मार्ग प्रकल्पासाठी जागा द्यावी लागणार आहे. एक अख्खी चाळ काळाच्या पडद्याआड जाण्याची चिन्हे असून १७ रहिवासी अस्वस्थ झाले आहेत.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**मध्य मुंबई (सा. बां) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई- ४०० ०१८**
Email : centralmumbai.ee@mahapwd.com **दूरध्वनी क्रमांक ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स- २४९३१९०२**
**जा क्र. का. अ/ममुंवि/निविदा/४११९ दिनांकः १/६/२०२१**
**ई-निविदा सूचना क्रमांक ३ सन २०२१-२२**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा. बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी:२४९३१९७२/२४९३६४०४) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील मजूर सहकारी संस्था मर्यादित यांच्याकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा. बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | रक्कम (लाखात) |
|---|---|---|
| १ | ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाणे येथील ३ युरोपियन पोलीस अधिकारी निवासस्थाने आरसीसी स्लॅब, दुरुस्ती लाद्या बसविणे, छताची दुरुस्ती करणे. | २९.१० |
| २ | ताडदेव पोलीस वसाहत येथील इमारत क्र. १ चे इमारतीची विविक्षित दुरुस्ती अंतर्गत गिलावा, पॉलीमर, रंगकाम इ. कामे करणे. | २५.३० |
| ३ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत डोंगरी पोलीस स्टेशन येथे रूफ, फ्लोरींग, शेडची दुरुस्ती तसेच गिलावा व रंगकाम करणे. | २९.९६ |
| ४ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत ताडदेव पेटीत मिल आवारातील इमारत क्र. ७ येथे गिलावा, रंगकाम, खिडक्या, लाद्या इ. दुरुस्तीची कामे करणे. | १९.८९ |
| ५ | आर्थर रोड जेल आवारात अधिकारी निवासस्थानांची दुरुस्ती करणे. | १२.९३ |
| ६ | ताडदेव पेटीट मिल आवारातील इमारत क्र. १, ७ व ११ येथे लाद्या, बाथरूम व शौचालयाची दुरुस्ती तसेच गिलावा व रंगकाम करणे. | २०.८२ |
| ७ | आर्थर रोड मध्यवर्ती कारागृहामध्ये पंपरूम व्हीडीओ कॉन्फरसींग रूम प्रसाधनगृहे, ड्रेनेज लाईन इ.ची दुरुस्ती करणे. | १९.४८ |
| ८ | उमरखाडी बालसुधारगृह येथील हॉस्पीटल वॉर्ड व इमारतीची टेरेस शेड, पॉलीमर, गिलावा, रंगकाम इ. कामे करणे. | १४.९९ |
| ९ | आर्थर रोड जेल आवारामध्ये बॅरेक क्र. १० व ११ येथील छतांची विशेष दुरुस्ती कार्यक्रम अंतर्गत करणे. | १२.८२ |
| १० | ताडदेव पोलीस कंम्पाऊंड येथे मोटर परिवहन उपविभागाकरिता कर्मचारी कक्षांचे बांधकाम करणे. | २४.०९ |
| ११ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत पोदार महाविद्यालय मल:निस्सारण वाहिनीची दुरुस्ती करणे व रसशाळा, प्रयोगशाळेची दुरुस्ती करणे. | २६.९३ |
| १२ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत परिचारीका वसतिगृहामध्ये तळमजला, पहिला मजल्यावरील शौचालय व प्रसाधनगृहाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे | २४.६२ |
| १३ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत पोदार वैद्यक महाविद्यालय येथील संरक्षक भिंतीची दुरुस्ती करणे व कॅन्सर संशोधन इमारतीच्या समोर काँक्रिटीकरण करणे. | २४.८९ |
| १४ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वरळी पोलीस ठाणे इमारतीच्या समोर, डाव्या व मागील बाूस काँक्रिटीकरण करणे. | १३.८७ |
| १५ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत रसशाळा इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील अभ्यंगत कक्ष, ग्रंथालय विभागाचा गिलावा, रंगकाम, दरवाजे, खिडक्या व फरशीची दुरुस्ती करणे. | २९.९६ |
| १६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत सावली इमारत, वरळी येथील सदनिका क्र. ब३/१, ब३/२, ब३/३, ब३/४, ब३/५, ब३/६, ब३/७, या सदनिकांची अंतर्गत दुरुस्ती करणे (एकूण ७ सदनिका) | २९.९५ |
| १७ | विशेष दुरुस्ती अंतर्गत माहिम, मुंबई येथील नविन पोलीस वसाहत क्र. ९ येथे बाह्य गिलावा व रंगकाम करणे. | १९.९९ |
| १८ | विशेष दुरुस्ती अंतर्गत माहिम, मुंबई येथील नविन पोलीस वसाहत क्र. १६ येथे बाह्य गिलावा व रंगकाम करणे. | १९.९९ |
| १९ | माहिम येथील माहिम पोलीस वसाहत इमारत क्र. १३ इमारतीमधील प्रसाधनगृह शौचालय दुरुस्ती व दरवाजे नुतनीकरण, किचन ओटा, गळतीप्रतिबंधक प्रक्रिया व लादीची दुरुस्ती करणे. | १९.९९ |
| २० | हाफकिन महामंडळ, परळ, मुंबई आवारातील ओएलडी इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचे नुतनीकरण करणे (भाग-३) | १७.९६ |
| २१ | हाफकिन महामंडळ, परळ, मुंबई आवारातील जीएडी इमारतीची अंतर्गत दुरुस्ती करणे. | १९.७२ |
| २२ | हाफकिन संस्था, परळ, मुंबई आवारातील एसएएस क्वार्टर्स इमारतीमधील सदनिका क्र. ६ ची दुरुस्ती करणे. | १९.९० |
| २३ | हाफकिन संस्था, परळ, मुंबई आवारातील एसएएस क्वार्टर्स इमारतीमधील सदनिका क्र. ५ ची दुरुस्ती करणे. | १९.९० |
| २४ | हाफकिन संस्था, परळ, मुंबई आवारातील एसएएस क्वार्टर्स इमारतीमधील सदनिका क्र. १ ची दुरुस्ती करणे. | १९.९१ |
| २५ | हाफकिन संस्था, परळ, मुंबई आवारातील ऑफिसर बंगल्याची अंतर्गत दुरुस्ती करणे. | १४.८८ |
| २६ | हाफकिन महामंडळ, परळ, मुंबई आवारातील फार्मा विभागाच्या सभोवतालच्या परिसरातील कॉंक्रिट पेव्हर ब्लॉकची दुरुस्ती करणे. | १९.७१ |
| २७ | हाफकिन महामंडळ, परळ, मुंबई आवारातील ओएलडी इमारतीच्या पहिल्या मजल्याचे नुतनीकरण करणे. (भाग ३) | १९.७२ |
| २८ | हाफकिन महामंडळ, परळ, मुंबई आवारातील फार्मा विभागाची अंतर्गत दुरुस्ती करणे. | १९.६२ |
| २९ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. अ मधील सदनिका क्र. १० ते १७ मध्ये अंतर्गत दुरुस्ती करणे. | २०.१६ |
| ३० | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. अ मधील सदनिका क्र. १८ ते २६ मध्ये अंतर्गत दुरुस्ती करणे. | १९.४९ |
| ३१ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. अ मधील सदनिका क्र. २७ ते ३४ मध्ये अंतर्गत दुरुस्ती करणे. | २०.२४ |
| ३२ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. अ मधील सदनिका क्र. ३५ ते ४३ मध्ये अंतर्गत दुरुस्ती करणे. | २०.३० |
| ३३ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. अ मधील सदनिका क्र. ४४ ते ५१ मध्ये अंतर्गत दुरुस्ती करणे. | २०.२६ |
| ३४ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. ब मधील सदनिका क्र. १ ते ११ मध्ये अंतर्गत दुरुस्ती करणे. | १९.४९ |
| ३५ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. ब मधील सदनिका क्र. ४५ ते ५५ मध्ये अंतर्गत दुरुस्ती करणे. | १८.८८ |
| ३६ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. ब मधील सदनिका क्र. ६७ ते ७७ मध्ये अंतर्गत दुरुस्ती करणे. | २०.२९ |
| ३७ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. ब मधील सदनिका क्र. ७८ ते ८८ मध्ये अंतर्गत दुरुस्ती करणे. | २०.८९ |
| ३८ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारतीच्या छतावर प्रकोटेड जी.आ.शीट बसविणे. | १५.४६ |
| ३९ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत काळाचौकी पोलीस स्थानक इमारती अंतर्गत दुरुस्ती, तळफरशी, प्रसाधनगृह, गळतीप्रतिबंधक उपाय योजना करणे. | २२.४५ |
| ४० | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत काळाचौकी येथील श्वान पथक इमारतीची अंतर्गत दुरुस्ती, तळफरशी, प्रसाधनगृह, गळतीप्रतिबंधक उपाय योजना करणे. | २०.०० |
| ४१ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. अ मधील सदनिका ६१ ते ६८ मध्ये दुरुस्ती करणे. | २०.५४ |
| ४२ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. ब मधील सदनिका १२ ते २२ मध्ये दुरुस्ती करणे. | २०.६२ |
| ४३ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. ब मधील सदनिका २३ ते ३३ मध्ये दुरुस्ती करणे. | १९.८७ |
| ४४ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत वाडीबंदर पोलीस वसाहत इमारत क्र. ब मधील सदनिका ३४ ते ४४ मध्ये दुरुस्ती करणे. | २०.२५ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. ०८/०६/२०२१ सकाळी १५.०० पासुन ते २२.०६.२०२१ रोजी १५.००पर्यंत ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) दि. २३/०६/२०२१ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा. बां.) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी मुंबई- ४०० ०१८)**
खालील संकेतस्थळावरून ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1) http://mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल)
३. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग वरळी मुंबई कार्यालयातील सूचना फलक

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा. बां.) विभाग
वरळी, मुंबई

**डीजीआयपीआर/२०२१-२०२२/७१५**

## मुलुंडमध्ये पॉश सोसायटीनं केली वीजचोरी, रक्कम ऐकून थक्क व्हाल, महावितरणच्या तपासणीत चोरी उघड

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** मुलुंडच्या एका पॉश सोसायटीमध्ये तब्बल ६३.२३ लाखाची वीजचोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मुलुंडमधील निर्मल लाईफ स्टाईलच्या नवीन बांधकाम झिरकोन को. ऑप. हाऊसिंग सोसायटीत महावितरणच्या तपासणी दरम्यान १,७६,१०० युनिटची तब्बल ६३.२३ लाखाची वीजचोरी झाल्याचे समोर आले आहे. याबाबत मुलुंड पोलीस ठाण्यात विद्युत कायदा २००३, कलम १३५ अन्वये निर्मल लाईफ स्टाईल व झिरकोन को. ऑप. हाऊसिंग सोसायटीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे (एफआयआर-फि. स्था.ख.क्र.६७, वष.र्२०२१ दि.४.०६.२०२१). याबाबत पोलीस पुढील तपास करत आहे. महावितरणचे अधिकारी



आपल्या नियमित चेकिंगसाठी मुलुंड पश्चिम येथील निर्मल लाईफ स्टाईलच्या झिरकोन को. ऑप. हाऊसिंग सोसायटीत गेले असता वीज चोरी होत असल्याचा संशय महावितरणच्या अधिकाऱ्यांना आला. तेथे सखोल चौकशी केल्यानंतर या ३१ मजली इमारतीच्या बांधकामासाठी लगतच्या बी. एम. सी.च्या आऊट-गोईंग स्विचला, दुसरी विनामीटर केबल जोडून २ वर्षापासून वीजचोरी होत असल्याचे आढळून आले.

## प्री-वेडिंग शूटच्या माध्यमातून पर्यटन विकास साधा: विरोध करणाऱ्यांचे उपमुख्यमंत्र्यांनी ओढले कान

**रायगड (सम्यक कासारे)-** ऐतिहासिक स्थळांवर प्री-वेडिंग शूट करण्यावरुन मध्यंतरी बराच वादंग निर्माण झाला होता. मात्र प्री-वेडिंग शूटच्या माध्यमातून पर्यटन स्थळांचा विकास साधण्याबाबत प्रशासनाने विचार करावा, अशी सूचना करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्री-वेडिंग शूटला विरोध करणाऱ्यांचे कान ओढले आहेत. पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या श्रीवर्धन मतदार संघातील तब्बल २३ कोटी रुपयांच्या पाणी पुरवठा



योजनेच्या कामाचे भूमिपजन पवार यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी ते बोलत होते.'सध्या प्री-वेडिंग शूटचा ट्रेंड आहे. लग्नाआधीच्या आठवणींसाठी विवाह बंधनात अडकणारे जोडपे असे चित्रिकरण करतात. प्री-वेडिंग शूटचा व्यवसाय आहे. त्यामुळे गड-किल्ले यावर प्री-वेडिंगचे शूटींग करताना त्यांना अडवू नका. प्री-वेडिंग शूटच्या माध्यमातून पर्यटन विकास कसा साधता येईल याचा विचार करा. त्याबाबत आवश्यक ती नियमावली जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षक यांनी एकत्रित तयार करावी. तसेच त्यासाठी काही शुल्कही आकारावे. प्री-वेडिंग शूटकडे उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून पाहा,' असा सल्ला पवार यांनी दिला.

## मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि एशियाटिक सोसायटीतील दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखितांचे होणार डिजिटायझेशन -मंत्री उदय सामंत

**मुंबई (योगेश होळंब)-** मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखितांचे आणि एशियाटिक सोसायटी, मुंबई या संस्थेकडे असलेल्या दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखितांचे डिजिटायझेशन करण्यासाठी या दोन्ही संस्थांना प्रत्येकी ५ कोटी रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला असल्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. श्री.सामंत म्हणाले, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय या ग्रंथालयाची स्थापना दिनांक १ ऑगस्ट, १८९८ साली झाली. सद्य:स्थितीत हे ग्रंथालय शासनमान्य 'जिल्हा -अ' वर्ग ग्रंथालय म्हणून कार्यरत आहे. या ग्रंथसंग्रहालयामध्ये १,९३,४०० इतकी ग्रंथ संख्या असून दोलामुद्रिते ५,००० आहेत. या ग्रंथालयामध्ये हस्तलिखित पोथ्या, विविध लेखकांचे साहित्य, हस्ताक्षरे



यांचा संग्रह असून त्यांचे जतन, संरक्षण व संवर्धन करणे आवश्यक आहे. हे लक्षात घेता या दुर्मीळ ग्रंथांचे व हस्तलिखितांचे डिजिटायझेशन करण्यासाठी रूपये ५ कोटी विशेष अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुंबई एशियाटीक सोसायटी या संस्थेची स्थापना १८०४ साली झाले. सन १९५० मध्ये राज्य शासनाने राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना करुन एशियाटीक सोसायटीस राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे काम बघण्यास निर्देश दिले होते. एशियाटीक सोसायटी ही संस्था २०० वर्षापूर्वी स्थापन झालेली असल्यामुळे या संस्थेकडे असलेल्या दुर्मीळ ग्रंथांचे व हस्तलिखितांचे डिजिटायझेशन करण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये राज्य शासनाकडून रु. ५.०० कोटी अनुदान मंजूर करण्यात आले होते.

## पुण्यातील हॉटेल साई गार्डनवर पोलिसांची 'रेड', लॉकडाऊन नियमांचं उल्लंघन करत सुरू होतं 'डांगडिंग', ४१ तळीरामांवर कारवाई

**पुणे (अभिजीत येरल्लू)-** पुणे शहरात प्रादुर्भाव वाढल्याने लॉकडाऊन करण्यात आले आहे. मात्र, कोरोनाच्या नियमांचे उल्लंघन करुन सुरु असलेल्या मद्य पार्टीवर पुणे पोलिसांनी छापा Raid टाकून ४१ तळीरांमाना दणका दिला आहे. पोलिसांनी पुण्यातील मांगडेवाडी येथील हॉटेल साई गार्डनवर छापा टाकून ४१ मद्यपींवर कारवाई करून ७ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई शनिवारी रात्री आठच्या सुमारास करण्यात आली. शहरात कडक संचारबंदी असताना हॉटेल साई गार्डनमध्ये मद्य पार्टी सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.



मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकला. त्यावेळी ३५ ते ४० व्यक्ती दारु पित व जेवण करताना आढळून आले. पोलिसांनी हॉटेलचे मालक महेश लोणारे व गणेश घाटे यांच्यासह ३९ मद्यपींना ताब्यात घेतले. तसेच ५७४० रुपयांची दारु व रोख रक्कम, २५ दुचाकी, एक रिक्षा, एक चारचाकी असा एकूण ७ लाख ५ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यातील पोलीस अंमलदार विजय दुधाळे व शिंदे कात्रज परिसरात पेट्रोलिंग करत होते. मांगडेवाडी फाटा येथील साई गार्डन या हॉटेल समोरील पार्किंगमध्ये मोठ्या प्रमाणात दुचाकी पार्क केलेल्या दिसल्या.

## बेवारस मृतदेह



**०२/०६/२०२१ रोजी ११.३० वाजताच्या पूर्वी निर्मल नगर पो ठाणे हद्दीत बेवारस मृतदेह चामडावडी नाला इंदिरा नगर बांद्रा ईस्ट मुंबई येथे नाल्याच्या पाण्यावर तरंगत असलेल्या अवस्थेत मिळून आला आहे.**

**वय ३५ ते ४५ वर्ण सावळा, उंची ५.९ इंच, माध्यम बांधा फेंच कट, दाढी भुवया जाड, उजव्या पायाला अंगठ्यास काळा धागा,काळया रंगाची हाफ पँट, फिक्कट हिरवा रंगाचा फुल शर्ट.**

**सदर वर्णनाचा वरील व्यक्ती आपल्याला माहित असल्यास कृपया निर्मल नगर पो ठाणे, बांद्रा पू.मुंबई येथे संपर्क करावे**

**फोन: २२२६४७९३७२**

**सुशांत कुमार पाटील**
**(पोलिस उप निरीक्षक, निर्मल नगर पोलिस ठाणे)**

## जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेतील त्रुटी तात्काळ दूर कराव्यात

**रत्नागिरी (अमोल गुडेकर)-** कोरोनाच्या संकट काळात वैद्यकीय कर्मचारी वर्ग आपला जीव धोक्यात घालून कार्य करत आहे. त्यांच्या या कार्याचे कौतुक आहेच. परंतु काही ठिकाणी सर्व सामान्य नागरिकांच्या आरोग्य यंत्रणेबाबत समस्या आहेत. त्या तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत. त्या तात्काळ सोडवणे अत्यंत गरजेचे आहे याबाबत भाजपचे नेते, महाराष्ट्र प्रदेश सचिव, माजी खासदार निलेश राणे यांनी रत्नागिरीच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे. पत्राद्वारे निलेश राणे म्हणाले की, जिल्हा रुग्णालयाकडून पीआरओची स्वतंत्र नेमणूक केली जावी. रुग्णालयातील कंट्रोल रूममधून रुग्णांच्या नातेवाईकांना आवश्यक ती माहिती



योग्य प्रकारे दिली जात नाही. त्यामुळे नातेवाइकांची धावपळ होत आहे. ही नेमणूक झाल्यास नातेवाईकांना योग्य माहिती मिळू शकेल. अनेकदा रुग्णवाहिका वेळेत मिळत नाही आणि मिळाल्यास मोठ्या प्रमाणात शुल्क लावले जाते. त्यावर आपले व जिल्हा शल्य चिकित्सक यांचे नियंत्रण असायला हवे. याचबरोबर महिला रुग्णालयात आवश्यक त्या प्रमाणात पाण्याची सोय नाही. तसेच महिला रुग्णालयात वॉर्डबॉय, महिला शिपाईची पदांची संख्या वाढवून ती भरावीत.

## ठाण्यातील गोंधळाला अखेर पूर्णविराम; टाळे उघडण्यास प्रारंभ

**ठाणे (तृप्ती गोरे)-** ठाणे जिल्ह्यातील शहरांच्या अनलॉकविषयी निर्माण झालेल्या गोंधळाला रविवारी दुपारी जिल्हाधिकारी राजेश नार्वेकरांच्या आदेशानंतर पूर्णविराम मिळाला. परंतु राज्य शासनाकडून निर्देश देऊनही स्थानिक प्रशासनाकडून आदेश काढण्यात होत असलेली दिरंगाई आणि प्रशासकीय विसंवादाचे दर्शन यामुळे घडले. ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडून काढण्यात आलेल्या आदेशावर ५ जूनची तारीख असली तरी हे आदेश नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी रविवार उजाडल्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.

राज्य शासनाने शनिवारी अनलॉक संदर्भातील नियमावली जाहीर करून करोना पॉझिटिव्हीटी दर आणि शहरातील ऑक्सिजन खाटांवरील रुग्णांचे प्रमाण यानुसार शहरांचे गट निश्चित केले. तसेच जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्तांच्या मार्फत या संदर्भात सविस्तर नियमांचे आदेश काढण्याची सूचना दिली होती. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील सर्व शहरांमध्ये आपण कोणत्या गटामध्ये याचा



शोध सुरू झाला होता. ठाणे शहर पहिल्या गटात की, तिसऱ्या गटात यावरून गोंधळ सुरू झाला होता. त्यामुळे दिवसभर संभ्रमाचे वातावरण असल्याने नागरिकांना दुकाने उघडायची, की बंद करायची असा संभ्रम निर्माण झाला होता. अखेर ठाण्याचे जिल्हाधिकारी आणि आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेश नार्वेकर यांनी शनिवारी रात्री उशिरा काढलेले आदेश महापालिकांना पाठवण्यात आले.

# क्युबा देशाकडून एकाच वेळी कोविडच्या ५ लसी विकसित

**सोबेराना क्युबा: क्युबा हा आपल्या भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या तुलनेत फक्त साडे तीन टक्के जमीन (१०९,८८४ वर्ग किमी) आणि फक्त १.१० कोटी अशी दिल्ली इतकी लोकसंख्या असलेला कम्युनिस्ट देश आहे. हा देश आज कोरोनाच्या ५ लसी तयार करणाच्या मार्गावर आहे. ही पहिली क्यूबन आणि लॅटिन अमेरिकन लस आहे. एकाच वेळी ५ लसी विकसित करण्याच्या तयारीत असलेला हा जगातला एकमेव देश आहे. जगात सर्वात मोठी लोकसंख्या, क्षेत्रफळ, अर्थव्यवस्था व सैन्यशक्ती असलेल्या देशांना जे जमले नाही ते ह्या छोट्या देशाने साध्य केले आहे. स्वतःच्या लसी विकसित करून क्युबाने आपली सार्वजनिक आरोग्य व्यवस्था आणि बायोटेक क्षेत्रातली आपली शक्ती सर्वांना दाखवून दिली आहे. आज, क्युबा त्या काही निवडक विकसनशील देशांसोबत उभा आहे ज्याची स्वतःची लस तयार करण्याची आणि निर्यात करण्याची क्षमता आहे.**

क्युबा हा खूप गरीब देश आहे, औषध निर्मिती किंवा किंवा अन्न विकत घेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पैशांमधला एकही पैसा कोविड लस तयार करण्यासाठी वळविण्यात आला नाही. इतर प्रकल्पांसाठी त्यांच्याकडे असलेली सर्व संसाधने सर्जनशील पद्धतीने या दिशेनं वळवण्यात आली. तिथल्या वैज्ञानिकांना फारच कमी गोष्टीत कामं करण्याची सवय आहे, ती यावेळी ही उपयोगी पडली.

**कोविड आणि क्युबा**

मागच्या वर्षी कोविड आजार देशात आला तेव्हा क्युबाच्या २८,००० हून अधिक वैद्यकीय विद्यार्थ्यांनी सक्रिय स्क्रीनिंग प्रोग्राम आखून देशातल्या ९० लाख म्हणजेच जवळपास संपूर्ण लोकसंख्येपर्यन्त पोहोचले. देशाच्या सीमा बंद केल्या गेल्या आणि पृथक्करण केंद्रे आणि चाचणी आणि शोध काढण्याची एक प्रभावी प्रणाली स्थापित केली. देशाची जीडीपी ११ टक्क्यांनी घसरली. दरवर्षी येणारे ४० लाख पर्यटक रोडावून फक्त ८० हजार राहिले. पण त्यामुळे अगोदरच कमकुवत असलेली आणि पर्यटनवर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था गडगडली. अमेरिकेने घातलेल्या निर्बंधांमुळे आर्थिक उपाययोजना करता येणं शक्य नव्हतं. कोरोनाचा आजार या देशाला चांगलाच महागात पडला. बिकट आर्थिक परिस्थितिमुळेच बहुराष्ट्रीय औषधी कंपन्यांकडून कोविड लस खरेदी करणे किंवा जागतिक आरोग्य संघटनेच्या जागतिक कॉव्हॅक्स लस सामायिकरण उपक्रमासाठी साइन अप करणे त्याने निवडले नाही.

कोरोनाव्हायरशी झुंज देत असताना आणि देशभर अन्न व औषधांच्या गंभीर टंचाईला तोंड देत असलेल्या कम्युनिस्ट देश क्युबाने कोविडच्या लक्षणांवर उपचार करण्यासाठी तब्बल १३ विविध औषधे तयार केली. आता पाच कोरोनाव्हायरस लस तयार होण्याच्या प्रक्रियेत असल्याची घोषणा करत संपूर्ण जगाला एका प्रकारे धक्का दिला आहे. त्यापैकी दोन लसी अंतिम टप्प्यात आहेत. गेल्या महिन्यात, हवानाच्या फिन्ले इन्स्टिट्यूटच्या संशोधकांनी घोषित केले की त्यांची सोबेराना २ लस अत्यंत प्रभावी आहे आणि ती क्लिनिकल चाचण्यांच्या अंतिम टप्प्यात प्रवेश करीत आहे. जर चाचण्या यशस्वी झाल्या तर क्युबा स्वतःचा कोरोनाव्हायरस लस विकसित करणारा एकमेव लॅटिन अमेरिकन देश बनेल. आंतर्राष्ट्रीय पर्यटनात मोठी घट झाल्याने भयंकर मंदीतून जात असेलेला या लसींमुळे आपल्या स्वत:च्या लोकसंख्येला या प्राणघातक आजारापासून तर वाचवणारच पण हयातून क्युबाला आपली अर्थव्यवस्था पुनरुज्जीवित करण्यास देखील मदत होईल. सोबेराना -२ यशस्वी झाल्यास, लसीकरणाचे राष्ट्रीय प्रयत्न संपल्यानंतर क्युबाने कमी किंमतीत ती निर्यात करण्याची योजना आखली आहे. ज्याने या देशाच्या अर्थव्यवस्थेत थोडीफार सुधारणा होऊ शकेल.

**लसींच्या नावात काय आहे?**

क्युबाचं इतिहास आणि चिवटपणा या लसींच्या नावातही दिसून येतो. दोन लसींना 'सोबेराना' ध व ध्द असे नाव आहे. ह्या स्पॅनिश शब्दाचा अर्थ 'सार्वभौमत्व' असा होतो. पहिल्या सोबेराना चाचणीची घोषणा केल्यानंतर लोकांना हे नाव इतके आवडले की ते बदलणे अशक्य झाले. हा नाव क्युबामध्ये इतक्या अभिमानाने घेण्यात आलं की सरकारकडे लससाठी सोबेराना हा नाव ठेवण्याशिवाय पर्याय उरला नाही. क्युबाच्या क्रांतीचा नायक जोस मार्ती यांनी लिहिलेल्या काव्यानंतर आणखी एकाचे नाव 'अब्दाला' ठेवण्यात आले. स्पॅनिश वसाहतवादाविरूद्ध स्वातंत्र्यासाठी लढा दिलेल्या एका क्युबन क्रांतिकारकच्या नावावर पाचव्या लसचं नाव 'मंबिसा' असं आहे. अब्दाला व मंबिसा ह्या दोन्ही लसी नाकातून स्प्रेच्या माध्यमातून घ्यायच्या आहेत. सोबेराना २ आणि अब्दाला चाचणीच्या तिसऱ्या व शेवटच्या टप्प्यात आहेत. गेल्या महिन्यात सोबेराना २ साठी क्लिनिकल चाचण्यांचा अंतिम टप्पा सुरू झाला. या लसीच्या शेवटच्या चाचणीत ४४,००० पेक्षा जास्त लोक भाग घेत आहेत. क्युबातील १,२४,००० आरोग्य सेवा कामगारांना यापूर्वीच अब्दाला लस देण्यात आली आहे. इराण आणि व्हेनेझुएलासह संबंधित देशांमध्येही या लसीची चाचण्या घेण्यात येत आहेत.

सोबेराना २ आणि अब्दाला या दोन्ही लस पारंपारिक संयुग्मक लस आहेत, ज्याचा अर्थ असा होतो की कोरोनाव्हायरस स्पाइक प्रोटीनचा एक भाग कॅरिअर रेणूसह एकत्रित केला जातो ज्यामुळे कार्यक्षमता आणि स्थिरता दोन्हीला चालना मिळते. कोणत्याही विशेष रेफ्रिजरेशन आवश्यकतेशिवाय कित्येक आठवडे टिकून राहतील आणि ४६.४ डिग्री तापमानापेक्षा जास्त काळ





तापमानात दीर्घकाळ साठवले जाऊ शकण्याच्या दर्ज्यावर लक्ष दिले जात आहे. असं झालं तर हे कोल्ड स्टोरेज साखळी नसणाऱ्या गरीब उष्ण कटिबंधीय देशांसाठी वरदान ठरेल. पाश्चिमात्य बहुराष्ट्रीय औषध कंपन्यांकडून लस खरेदी करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या विकसनशील देशांना हा व्यवहार्य पर्याय ठरू शकेल. क्युबाच्या आरोग्य व्यवस्थेवर पूर्ण विश्वास असल्याने काही देशांनी १० कोटी डोस खरेदी करण्यासाठी सरकारकडे संपर्क साधला आहे. युनायटेड स्टेट्स आणि इतर पाश्चात्य देशांमध्ये निर्मीत लशी परवडणाऱ्या नसल्याने अनेक गरीब देश आता क्यूबाकडे अधिक परवडणाऱ्या लसींसाठी वळत आहेत. मेक्सिको आणि अर्जेंटिनाने क्युबाच्या लसमध्ये रस दर्शविला आहे. सध्या दरवर्षी १ कोटी लस तयार करण्याची क्युबाची क्षमता आहे. म्हणून वाढत्या मागण्यांमुळे क्युबाच्या लस निर्मिती क्षेत्रालास संजीवनी मिळेल. व्हेनेझुएला आपल्या देशातच अब्दाला लस तयार करेल, असे सरकारने या महिन्याच्या सुरूवातीला जाहीर केले.

हे सध्या करणे क्युबासाठी किती अवघड आहे त्याची आपल्याला कल्पना देखील नाही.

ऐतिहासिक क्युबन क्रांती: एकेकाळी अमेरिकेसाठी अय्यशीचा आणि लूटीचा अड्डा बनलेल्या क्युबात अमेरिकेच्या हातातली बाहुली असलेल्या फुलजेनसिओ बटिस्टाच्या सैनिकी हुकूमशाहीची सत्ता होती. फिदेल कॅस्ट्रो आणि चे ग्वेरा या क्रांतिकारकांनी जुलै १९५३ ते डिसेंबर १९५८ या ५ वर्षांच्या दरम्यान ह्या हुकूमशाहीविरूद्ध सशस्त्र बंड करत अत्यंत प्रतिकूल आणि साधनहीन परिस्थितीत चिवट झुंझ आणि बलिदान देऊन बतिस्ताला हद्दपार केले. मार्क्सवाद – लेनिनवादाच्या क्रांतिकारक विचारसरणीने प्रभावित या क्रांतिकारकांनी आपल्या पक्षाला ऑक्टोबर १९६५ मध्ये क्युबा कम्युनिस्ट पार्टी असे नाव दिले. तो भांडवलशाही अमेरिका आणि साम्यवादी रशिया दरम्यान शीतयुद्धाचा काळ होता. अमेरिकेच्या फ्लॉरिडा राज्यापासून क्युबा फक्त १६५ किमीच्या अंतरावर म्हणजे मुंबई ते नाशिक इतक्याच अंतरावर आहे. शक्तिशाली अमेरिकेच्या नाकावर टिच्चून क्रांति झालेला क्युबा त्याच्या मर्मस्थानी बसलेली आजवर न भरून येणारी जखम बनली.

**क्युबा बर्बाद करण्यासाठी निर्बंध:**

क्रांतीनंतर महाकाय अमेरिकेने या लहान गरीब देशावर प्रतिबंधांचे हत्यार उपसले. क्युबातले उसाचे मळे, कारखाने, शहरं यांच्यावर बॉम्ब हल्ले करण्यात आले. फिदेल कॅस्ट्रो आणि चे ग्वेरा यांची हत्या करण्यासाठी सीआयए ने जे काही शक्य होते ते सर्व काही केले. क्युबाविरूद्ध अमेरिकेने लावलेलं प्रतिबंध मागच्या ६० वर्षांच्या इतिहासात सर्वात दीर्घ काळापर्यंत लागू असलेला प्रतिबंध आहे.

अमेरिकन व्यवसायिकांना व व्यवसायांना क्युबासह व्यापार करण्यास प्रतिबंधित लावले गेले. क्युबाला शस्त्रांच्या विक्रीवर बंदी घातली. ऑक्टोबर १९६०मध्ये अमेरिकेने सरकारने क्युबाने गुडघे टेकावे म्हणून तिथे तेल निर्यात करण्यास नकार दिला, क्युबा सोव्हिएट रशियाच्या कच्च्या तेलावर अवलंबित झाला तेव्हा क्युबामधील अमेरिकन कंपन्यांनी तो कच्चा तेल परिष्कृत करण्यास नकार दिला. शेवटी क्यूबाने अमेरिकन-मालकीच्या क्यूबान ऑईल रिफायनरीजचे राष्ट्रीयकरण केले. याने चवताळलेल्या अमेरिकेने क्युबाच्या जवळपास सर्व निर्यातीवर बंदी घातली. अमेरिकेने क्यूबाबरोबर इतर देशांनी खाद्यपदार्थांचा व्यापार केल्यास त्यांना देण्यात येणारी आर्थिक मदत बंद करण्याची धमकी दिली आणि काही ठिकाणी अंमलातही आणली. संयुक्त राष्ट्र महासभेत या क्रूरतेवर टीका करण्यात आली. यूएसच्या कंपन्या किंवा अमेरिकन भागीदारी असलेल्या कंपन्यांना क्युबामध्ये व्यापार केल्यास ते त्यांनी निर्बंधांच्या जोखमीवर करावा असे जाहीर करण्यात आले. तथापि, सर्व आयातींसाठी क्युबाला रोख रक्कम देणे बंधनकारक करण्यात आले. पत किंवा कर्जाची त्यांना परवानगी नाही. दोषी व्यक्तींना १० वर्षांच्या बंदिवासाची शिक्षा होऊ शकते. १९६२ साली जॉन एफ. केनेडी यांच्या अध्यक्षीय काळात व्यापार निर्बंधांची व्याप्ती अजून कडक करण्यात आली. क्युबात बनलेल्या उत्पादनांवर बंदी होतीच पण आता ती वाढवून क्युबा बाहेर असेंबल किंवा एकत्रीकरण करून बनवण्यात आलेल्या सर्व क्युबन उत्पादनांवर तो निर्बंध वाढवण्यात आला. क्युबाला मदत पुरविणाऱ्या कोणत्याही देशाच्या मदतीस प्रतिबंध करण्यात आले. कॅनेडीने अन्न आणि औषधांच्या विना-अनुदानित विक्री वगळता सर्व क्युबाच्या व्यापरांवर बंदी घातली गेली. केनेडीने १९६३ मध्ये प्रवासी निर्बंध घातले आणि अमेरिकेत क्युबाची मालमत्ता गोठविली गेली. क्युबात ये जा करणाऱ्या प्रवाशांना विमानतळावर जगभर लागू विमान प्रवास तिकिट कर भरणे देखील या अमेरिकेने त्यांच्या कायद्याने गुन्हा ठरवल्याने क्युबाचे पर्यटन मोडकडीस आले.

सोवियतच्या मदतीने तग धरलेल्या क्युबाला सोवियत रशिया कोसळल्याने मोठा धक्का पोहोचला. क्युबाची जीडीपी ३४ टक्के घसरली आणि व्यापार निम्मे झाले. रशियासोबतचे आयात निर्यात ६० ते ७५ टक्के घसरले आणि अर्थव्यवस्था भयंकर कोंडीत सापडली. या क्षणाची अतुरतेने वाट पाहत असलेल्या अमेरिकेच्या हाती तेव्हाही काही लागले नाही. फिडेल कॅस्ट्रो यांच्यावर क्युबन जनतेचा विश्वास निढळ राहिला. १९९२ मध्ये क्युबामध्ये व्यवसाय करणाऱ्या इतर देशांमधल्या परदेशी कंपन्यांना अमेरिकेत व्यवसाय करण्यापासून रोखून दंड आकारला जाऊ लागला. १९९६ मध्ये या कायद्यात अजून कठोरला आणून क्युबा सोबत व्यापार करणाऱ्या इतर देशांच्या कंपन्यांना अमेरिकेत बंदी घालण्यात आली. हा कायदा रद्द करणे उठवणे ओबामा यांनाही जमले नाही. हे निर्बंध सागरी वाहतुकीस देखील लागू होते, कारण क्युबा बंदरांवर थांबून आलेल्या जहाजांना अमेरिकन बंदरांवर सहा महिन्यांपर्यन्त गोदीत घेण्याची परवानगी नाही. ही साखळी २००० सालीच थोडी सैल झाली जेव्हा 'मानवतेच्या' कारणास्तव क्युबाला शेतीमाल व औषध विक्रीस सीमित प्रमाणात परवानगी देण्यात आली. मात्र अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकीर्दीत ६० वर्षे क्युबाची सामग्री विक्री करणाऱ्या कंपन्या घाबरल्या आणि उत्तर अमेरिकेबरोबरचा आपला व्यापार बंद पडण्याची भीती असल्याने क्युबासोबतचे व्यवसाय बंद केले. केवळ २०२० या एका वर्षातच अमेरिकेने शोधून-शोधून क्युबावर १०० हून अधिक नवीन निर्बंध लादले गेले आहेत.

**धडपड आणि प्राथमिकता:** अनेक दशकांपासून अमेरिकेने लावलेल्या निर्बंधांमुळे क्युबाच्या अर्थव्यवस्थेला अमाप हानी झाली. या कडक निर्बंधांमुळे क्युबाच्या आर्थिक विकासाला खीळ बसली. त्यातून मार्ग काढण्यासाठी कॅस्ट्रोने मजबूत सार्वजनिक शिक्षण व आरोग्य व्यवस्था तयार केली ज्यात खासगी संस्थांवर बंदी घातली गेली. शालेय व उच्च शिक्षण मोफत आणि अनिवार्य करण्यात आले. क्युबाच्या कम्युनिस्ट सरकारने ठामपणे सार्वत्रिक आरोग्य सेवा ही राज्य नियोजनाची प्राथमिकता म्हणून ठरवली आणि याचा विस्तार ग्रामीण भागांपर्यंत करण्यात आला. *(क्रमशः)*